अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । घाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९१ । शुक्रवार २४ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग ३६

## कुंडलिनी शक्ती

खूप लोकांना पहिल्यांदा पाहताना असे वाटते की हे काय मुलांचा खेळ आहे का? कुंडलिनी जागरण म्हणजे काय? कुंडलिनी जागरणाबद्दल जगभरात इतके सांगितले गेले आहे की – डोक्यावर उभे राहणे (शीर्षासन), नानाविध संकटे ओढवून घेणे; मग इतक्या सहजपणे कुंडलिनीचे जागरण कसे होऊ शकते? एखाद्या झाडाला जेव्हा फळ येण्याची वेळ येते, तेव्हाच फळे लागतात. पण याचा अर्थ असा नाही की यापूर्वी जे काही घडत होते ते गरजेचे नव्हते. तेही गरजेचे होते आणि आता फळ मिळणेही गरजेचे आहे. कुणीतरी म्हणते की, दहा हजार वर्षे झाली, तेव्हापासून तर कोणी पार झाले नाही, मग आताच कसे काय होत आहेत? अरे भाई, दहा हजार वर्षांपूर्वी तर कोणी चंद्रावर गेले नव्हते, मग आता का जात आहेत? आणि जर जात आहेत, तर त्यात शंका घेण्यासारखे काय आहे.रामदास स्वामींनी सांगितले आहे की, जगात काही लोक असतात ज्यांना 'पढत मूर्ख' म्हणतात. 'पढत मूर्ख' म्हणजे वाचून वाचून जे महामूर्ख होतात. ज्यांच्याबद्दल कबीरदासजींनी म्हटले आहे की, पढ़ी पढ़ी पण्डित, मूरख भय (वाचून वाचून पंडितही मूर्ख झाले). अशा लोकांची एक संस्थाच चालत असते. मग तो येशू ख्रिस्ताचा काळ असो, ज्ञानेश्वर माऊलींचा काळ असो वा शंकराचार्यांचा काळ असो; स्वतःला विशेष अतिशहाणे समजणारे, स्वतःला उच्च दर्जाचे विद्वान समजणारे लोक नेहमीच होते आणि राहतील. ते नेहमीच अशा प्रकारचे अडथळे निर्माण करत राहतील आणि जीवनाचे अमूल्य क्षण त्यातच वाया घालवतील. त्यांच्यावर कोणताही उपाय नाही..

**२३ मार्च १९७७ सहजयोग्यांशी हितगुज, मुंबई**

# ६० वर्षांनंतर केंद्राचा ऊस नियंत्रण कायदा बदलणार

## एफआरपी थकबाकीवर १५% व्याजाची तरतूद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. तब्बल ६० वर्षांपासून लागू असलेला १९६६ चा जुना 'ऊस नियंत्रण आदेश' रद्द करून त्याजागी अधिक कडक आणि पारदर्शक 'ऊस नियंत्रण आदेश २०२६' लागू करण्याची तयारी केंद्र सरकारने सुरू केली आहे. या नव्या धोरणामुळे साखर उद्योगात मोठी शिस्त येणार असून शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे वेळेत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नव्या कायद्यानुसार, कारखान्यांनी ऊस खरेदी केल्यानंतर १४ दिवसांच्या आत एफआरपी प्रमाणे पेमेंट करणे अनिवार्य असेल. जर कारखान्याने या मुदतीत पैसे दिले नाहीत, तर त्यांना थकीत रकमेवर १५ टक्के दराने व्याज द्यावे लागणार आहे. इतकेच नव्हे तर, पैसे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कारखान्यांकडून जिल्हाधिकारी भू-महसूल थकबाकीप्रमाणे कडक वसुली करतील. यामुळे वर्षानुवर्षे रखडणाऱ्या थकबाकीच्या प्रश्नातून शेतकऱ्यांची सुटका होणार आहे.

### २० मे पर्यंत हरकती व सूचना

**केंद्र सरकारने या नव्या मसुद्यावर २० मे पर्यंत नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवल्या असून, त्यानंतर हा कायदा देशभरात लागू केला जाईल. या निर्णयामुळे साखर उद्योगात मोठी स्थिरता आणि पारदर्शकता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**

### साखर कारखाने आता 'बायो-एनर्जी हब'

नव्या धोरणात केवळ साखरेवर अवलंबून न राहता इथेनॉल उत्पादनालाही साखरेइतकाच अधिकृत दर्जा देण्यात आला आहे. उसाचा रस, मळी आणि सिरप यांचा समावेश यात करण्यात आल्याने साखर कारखाने आता खऱ्या अर्थाने 'बायो-एनर्जी हब' म्हणून विकसित होतील. साधारणपणे ६०० लिटर इथेनॉल म्हणजे १ टन साखर असा निकष लावण्यात आला आहे.

### एफआरपी ठरवताना उपपदार्थांचाही विचार

शेतकऱ्यांच्या उसाचा दर (एफआरपी) ठरवताना आता केवळ साखरेचा उतारा न पाहता मळी, बगॅस आणि इथेनॉलपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचाही विचार केला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना भविष्यात अधिक योग्य आणि वाढीव दर मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# भारताच्या अपमानावर मोदी गप्प का?

## ॲड. प्रकाश आंबेडकरांचा पंतप्रधान मोदींवर संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**या सर्व पार्श्वभूमीवर, अमेरिकेला पंतप्रधान मोदींच्या अशा कोणत्या 'काळ्या कारनाम्यांची' माहिती आहे, ज्यामुळे ते सातत्याने होणारी ही बेइज्जती गप्प बसून सहन करत आहेत, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या ट्विटच्या माध्यमातून त्यांनी पंतप्रधानांच्या मौनाचा खरपूस समाचार घेतला.**

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या सोशल मीडियावरील ट्विटद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आणि त्यांच्या परराष्ट्र धोरणांवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी भारताला 'नर्क' संबोधून देशाचा अपमान केल्याचा दावा करत, ॲड. आंबेडकर यांनी या मुद्द्यावरून पंतप्रधानांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांच्या मते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'एपस्टीन फाइल'मध्ये आल्यापासून ते अमेरिकेसमोर कोणतीही भूमिका न घेता शरणागती पत्करत आहेत, ज्याचा फटका देशाला बसत आहे. या मौनामुळेच भारत आणि पंतप्रधान मोदी यांची जगभरात थट्टा उडवली जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

आपल्या ट्विटमध्ये ॲड. आंबेडकर यांनी अशा अनेक घटनांचा उल्लेख केला आहे, ज्यात अमेरिकेने भारताचा अपमान केला आणि पंतप्रधान मोदींनी त्यावर मौन बाळगले. त्यांनी नमूद केले की, अमेरिकेने भारतीय नागरिकांना बेड्या ठोकून भारतात पाठवले, भारतावर भारी आयात शुल्क (टॅरिफ) लादले आणि भारत-पाकिस्तान युद्धाच्या विषयावर ट्रंप यांनी एकतर्फी भूमिका घेतली, तरीही मोदी गप्प राहिले. तसेच, रशियाकडून तेल खरेदी न करण्याच्या अमेरिकेच्या आदेशाचे भारताने पालन करणे आणि इराणसारख्या आपल्या पारंपरिक मित्रांशी संबंध बिघडणे यांसारख्या बाबींवर पंतप्रधानांनी शांत राहणे पसंत केले आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.

## महत्वाचे..


### कांदा दरात घसरण : उच्चस्तरीय समिती गठीत

मुंबई : कांद्याच्या भावात घसरण झाल्याने राज्यातील उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कांदा बाजारभावातील घसरण व कांद्याबाबत सर्वंकष तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी सचिव स्तरीय समिती गठित केली आहे. वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) या समितीचे अध्यक्ष आहेत. तर त्यात चार सदस्यांचा समावेश आहे. याबाबतचा शासन निर्णय सहकार, पणन विभागाने गुरुवारी (दि.२३ एप्रिल) जारी केला. कांदा पिकविणाऱ्या राज्यांपैकी क्षेत्र आणि उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. राज्यात नाशिक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, जळगाव आणि धुळे हे जिल्हे कांदा उत्पादनात आघाडीवर आहेत. देशातील एकूण कांदा उत्पादनाच्या ४० ते ५० टक्के उत्पादन महाराष्ट्रात घेण्यात येते.महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादनात अग्रेसर असूनही कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यामध्ये कांद्याच्या दरातील घसरण, साठवणुकीबाबतच्या समस्या, पायाभूत सुविधांचा अभाव, केंद्र शासनाचे कांदा निर्यात धोरण याबाबींचा समावेश होतो.

# माझ्या पतीने गंभीर गुन्हा केला असेल, पण माझा सहभाग नाही

## राहाता कोर्टाने कल्पना खरातचा जामीन अर्ज फेटाळला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी :** माझ्या पतीने जर कोणताही गंभीर गुन्हा केला असेल, तर त्यामध्ये माझा कोणताही सहभाग नाही. माझ्याकडून पोलिसांना जप्त करण्यासारखा कोणताही महत्त्वाचा कागद किंवा पुरावा नाही त्यामुळे मला अटकपूर्व जामीन मिळावा अशी मागणी कॅप्टन खरातची पत्नी कल्पना हिच्या वकीलांनी केला असता तिचा जामीन अर्ज राहाता न्यायालयाने फेटाळला आहे.

कल्पना खरातच्या अटकपूर्व जामीन अर्जावर राहाता न्यायालयात बुधवारी सुनावणी पार पडली. कल्पना खरातच्या वतीने प्रशांत गिरी तर सरकारी वकील पानगव्हाणे तसेच मुळ फिर्यादी गोंदकर याचे वकील शुभम गोंदकर यांनी युक्तिवाद केला. फिर्यादीच्या वकिलांनी दावा केली की, या संपूर्ण व्यवहारात अनेक आर्थिक देवाण घेवाणी झाल्या असून हा प्रकार मनी लॉन्ड्रिंगशी संबंधित असू शकतो. संबंधित एमओयूमध्ये कल्पना खरात यांना दोन टक्के व्याज देण्याचा उल्लेख आहे, त्यामुळे त्यांना या व्यवहारातून आर्थिक फायदा होणार होता.

फिर्यादी पक्षाने आपली बाजू मांडताना म्हणाले की, ५७ जमिनींपैकी सुमारे ४० टक्के जमिनींवर कल्पना खरात यांचे नाव सातबाऱ्यावर आहे. त्यामुळे त्यांना व्यवहारांची पूर्ण माहित होती, असा दावा करण्यात आला. तसेच त्या खरेदीखत प्रक्रियेला उपस्थित होत्या आणि नोंदणी कार्यालयात त्यांची उपस्थिती, फोटो आणि अंगठ्याचे ठसे असल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयात सांगितले.

माझ्या पतीने जर कोणताही गंभीर गुन्हा केला असेल, तर त्यामध्ये माझा कोणताही सहभाग नाही. माझ्याकडून पोलिसांना जप्त करण्यासारखा **(पान ४ वर)**

# कॅप्टन खरातचा दलाल निलेश जपेवर ईडीची धाड

## मनी लॉड्रिंगचा संशय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** कॅप्टन खरातचे शिर्डीतील मायाजाल हळूहळू बाहेर येण्यास सुरु झाले असून राहाता पतसंस्थेच्या चौकशी नंतर आता ईडीने खरात चे दलालीचे काम करणारा निलेश जपे याचे वर काल इडीने छापेमारी करत महत्वाचे पुरावे गोळा केले आहेत.

काल सकाळीच साडे सात वाजेच्या दरम्यान इडी चे अधिकारी जपे याचे शिर्डीतील सन ॲन्ड सन रोडवरील असणाऱ्या हॉटेल मेरी गोल्ड व कोपरगाव येथील गोकूळ नगरी भागातील त्याचे निवासस्थानी दाखल झाले. त्यांनी वरील दोन्ही ठिकाणी प्रवेश करताच एकच धांदल उडाली.

सकाळीच गणधारी सुरक्षा रक्षकांसह पाच अधिकाऱ्यांनी हॉटेल मध्ये प्रवेश केला त्यांनी त्यांचे ओळखपत्र दाखवत थेट अकाऊंट रूम व जपे च्या कॅबीन चा ताबा घेतला तेथे असणाऱ्या लॅपटॉप , हार्डडिक्स तसेच लॉकर मधे असलेल्या दस्तावेज पडताळणीस सुरवात केली . हॉटेलच्या प्रशासनाने जपे याचे काम चालत असलेल्या सर्व खोल्या ताब्यात घेतल्या. तसेच तो सर्व परीसर सील करण्यात आला. आठ ते दुपारी तीन वाजेपर्यंत कारवाई सुरू होती त्यानंतर तीन वाजता हॉटेल कडून त्यांना रेस्टॉरंट मध्ये जेवण देण्यात आले .

नाशिक एसआयटीच्या तपासात निलेश जपे याचे खरातशी असलेले संबंध व आर्थिक व्यवहार उघड झाले असून त्या दिशेने ईडी चौकशी सुरू केली आहे.

निलेश जपे व खरातने यांनी शिर्डी परिसरात कुठे कुठे प्रॉपर्टीत गुंतवणूक केली याचा माहिती ईडीला प्राप्त झाली आहे त्यानुसार ईडीने हॉटेल व त्याच्या घरी जात त्या दिशेने तपास सुरू केला आहे. कॅप्टन खरात यास अटक होण्याच्या काही दिवस अगोदर निलेश जपे याच्या शिर्डीतील मेरीगोल्ड या ठिकाणी वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली असल्याचे पोलिसांच्या तपासात पुढे आले होते . आता या प्रकरणात ईडीची एन्ट्री झाल्याने त्यांना कोणते अक्षेपार्ह पुरावे आढळतात यावर जपे याचे भवितव्य ठरणार आहे.

### कोण आहे निलेश जपे ?

**निलेश भाऊसाहेब जपे हे सावळीविहीर येथील रहिवाशी असून त्यांचे वडील भाऊसाहेब जपे हे साखर अधिकारी होते त्यांनी गणेश नगर साखर कारखान्यात अनेक वर्षे काम तसेच महाराष्ट्रातील अनेक साखर कारखाना उद्योगात त्यांचे काम आहे. ते कोपरगाव येथे स्थायिक असून त्यांचा मुलगा निलेश हा शिर्डी परिसरातील मोठे उद्योजक आहे जमीन खरेदी विक्री धंद्यात ते अग्रेसर आहेत तसेच हॉटेल व्यावसायिक आहेत. ते धार्मिक वृत्तीचे असून ते तिरुपती देवस्थानचे ट्रस्टी होते.**




# मंत्री विखे-पाटलांचे जरांगे-पाटलांच्या आरोपांना प्रत्युत्तर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**धाराशीव :** मराठा आरक्षणाबाबत स्थापन झालेल्या उपसमितीने आतापर्यंत अत्यंत प्रभावीपणे काम केले असून, स्वतंत्र मराठा-कुणबी मंत्रालयाची कोणतीही आवश्यकता नाही, अशी स्पष्ट भूमिका महसूल मंत्री तथा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी त्यांच्या कार्यपद्धतीवर केलेल्या टीकेला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

विखे पाटील म्हणाले की, हैदराबाद गॅझेट लागू झाल्यापासून मराठा समाजातील नोंदी आढळलेल्या पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र वाटपाचे काम वेगाने सुरू आहे. उपसमिती स्थापन होण्यापूर्वी २ लाख प्रमाणपत्रे वाटण्यात आली होती, तर समितीच्या कार्यकाळात आतापर्यंत ५४ हजार प्रमाणपत्रांचे वाटप पूर्ण झाले आहे. या कामाचा संपूर्ण अहवाल जरांगे पाटील यांना पाठवण्यात आला असून, त्यांच्या मनातील गैरसमज लवकरच दूर केले जातील, असेही त्यांनी नमूद केले. **(पान ४ वर)**

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत सात उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद !

## तनपुरे घराण्यातील उमेदवार नसलेली ही पहिलीच निवडणूक !!

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** काल राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान मोठ्या बंदोबस्तात पार पडले. काल सकाळी सात वाजल्यापासून मतदानास सुरूवात झाली. त्यावेळी मतदानाचा वेग एकदम संथ गतीने सुरू होता. एकूण मतदारांची संख्या ३ लाख ३३ हजार ५४५ असून सकाळी अकरा वाजेपर्यंत ६०७८४ मतदान झाले म्हणजे फक्त १८:२२% टक्के मतदान झाले. त्या नंतर दुपारी एक वाजता मतदानाचा वेग वाढून ९८७४० मतदान झाले म्हणजे २९.६० टक्के, दुपारी तीन वाजता मतदानात थोडी वाढ होऊन १,३२२५५ मतदारांनी मतदान केले म्हणजे ३९.६५ टक्के पर्यंत मतदान पार पडली त्यानंतर दुपारी चार वाजता मतदानाचा वेग थोडासा वाढला सायंकाळी पाच वाजता मतदानाची आकडेवारी १,६९२४४, इतकी होऊन मतदान ५०.७४ टक्के पर्यंत झाले.



छाया राजेंद्र परदेशी

सायंकाळनंतर मतदारांची मतदान केंद्रावर गर्दी वाढल्याने सहा वाजता मतदान केंद्राचे दरवाजे बंद करण्यात आले व आत असलेल्या मतदारांची मतदान करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. प्रशासनाची अचूक आकडेवारी उशिरापर्यंत जाहीर झाली नसली तरी मतदानाची टक्केवारी अंदाजे ५५.३१ झाल्याचा अंदाज वर्तुविण्यात येत आहे राहुरी विधानसभेच्या होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी सुमारे ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये राजकीय पक्षांसह सात उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून त्यांचे भवितव्य काल मतपेटीत बंद झाले आहे. यामध्ये महायुतीचे भाजप प्रणित उमेदवार अक्षय कर्डिले, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके, यांच्यासह उद्धव ठाकरे शिवसेना गटाचे कट्टर समर्थक बंडखोर उमेदवार रावसाहेब खेवरे (अपक्ष) अथर्व म्हसे (अपक्ष) सूर्यभान लांबे (अपक्ष) महेश हापसे (अपक्ष) या उमेदवारांचा समावेश आहे.

यामध्ये सर्वच उमेदवारांनी विजयी होण्यासाठी कंबर कसली आहे. व सर्वच उमेदवार व त्यांचे समर्थकआपणच विजयी होणार याची ग्वाही मतदारांना देत आहेत. यावेळी प्रगती हायस्कूल येथे असलेल्या मतदान केंद्रावर माजी खासदार **(पान ४ वर)**



# संपादकीय

## महिला आरक्षण आणि परिसीमन: सत्तेचा खेळ

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात १७ एप्रिल २०२६ हा दिवस एका मोठ्या वैचारिक संघर्षाचा साक्षीदार ठरला. लोकसभा विस्तारीकरण आणि महिला आरक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू मांडणारे 'संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६' संसदेत दोन-तृतीयांश बहुमताअभावी मंजूर होऊ शकले नाही. या ऐतिहासिक घटनेचे विश्लेषण करताना केवळ राजकीय जय-पराभवाच्या चष्म्यातून न पाहता, देशाचे संघराज्य स्वरूप, महिलांचे राजकीय भवितव्य आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करणे आवश्यक आहे.

२०२३ मध्ये जेव्हा महिला आरक्षण विधेयक (नारी शक्ती वंदन अधिनियम) मंजूर झाले, तेव्हा संपूर्ण देशाने त्याचे स्वागत केले होते. ३३ टक्के आरक्षण हे महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी अत्यंत गरजेचे पाऊल आहे, यात कोणाचेही दुमत नाही. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाची भूमिका अशी आहे की, हे आरक्षण केवळ कागदावर राहू नये तर ते प्रत्यक्ष अंमलबजावणीत यावे यासाठी मतदारसंघांची फेररचना (परिसीमन) होणे तांत्रिकदृष्ट्या अनिवार्य आहे. पंतप्रधान मोदींच्या मते, हे विधेयक महिलांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठीचा एक प्रामाणिक प्रयत्न होता आणि विरोधकांनी तो रोखून महिलांचा अपमान केला आहे.

मात्र, याठिकाणी प्रश्न हा उपस्थित होतो की, महिला आरक्षणाला परिसीमनाच्या अटीत का अडकवले जात आहे? २० मे २०२६ च्या जनगणनेची वाट न पाहता किंवा जागा वाढवण्याची गुंतागुंत न करता, सध्याच्या ५४३ जागांवरच ३३ टक्के आरक्षण लागू का होऊ शकत नाही? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नसून सर्वसामान्य महिला मतदारांचाही आहे, ज्या अनेक दशकांपासून संसदेत आपल्या प्रतिनिधित्वाची वाट पाहत आहेत. या विधेयकाचा दुसरा आणि अधिक वादग्रस्त पैलू म्हणजे मतदारसंघांची पुनर्रचना. लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने मांडला आहे. सरकारचा तर्क असा आहे की, वाढत्या लोकसंख्येनुसार मतदारांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी जागा वाढवणे ही काळाची गरज आहे. मात्र, या प्रक्रियेत एक गंभीर पेच निर्माण झाला आहे, ज्याकडे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि अन्य दक्षिण भारतीय नेत्यांनी लक्ष वेधले आहे.

२००१ मध्ये तत्कालीन कायदामंत्री अरुण जेटली यांनी संसदेत स्पष्ट केले होते की, ज्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाचे धोरण यशस्वीपणे राबवले, त्यांना जागा कमी करून शिक्षा मिळता कामा नये. आज २०२६ मध्ये तीच भीती पुन्हा दाटून आली आहे. जर केवळ लोकसंख्येच्या जोरावर उत्तर भारतातील राज्यांच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढल्या आणि दक्षिण भारताचे प्रतिनिधित्व घटले, तर तो देशाच्या एकात्मतेसाठी आणि संघराज्य रचनेसाठी मोठा धोका ठरेल. 'जबाबदार राज्यांना शिक्षा नको' हे सूत्र आजही तितकेच प्रासंगिक आहे. या विधेयकावरून निर्माण झालेली कोंडी पाहता, दोन्ही बाजूंच्या राजकारणाचा वास येतो. विरोधकांच्या मते, हे विधेयक म्हणजे पश्चिम बंगाल निवडणुकीच्या तोंडावर रचलेले एक राजकीय 'नॅरेटिव्ह' आहे. दुसरीकडे, सरकारचा दावा आहे की ते 'एक देश, एक निवडणूक' या दिशेने जाण्यासाठी आणि देशाच्या प्रशासकीय गरजा पूर्ण करण्यासाठी हे बदल करू पाहत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मांडलेली भूमिका या संदर्भात महत्त्वाची ठरते. ''आरक्षण तत्काळ द्या, पण परिसीमनाच्या नावाखाली देशाच्या रचनेशी छेडछाड करू नका,'' ही त्यांची मागणी सर्वसमावेशक वाटते. मतदारसंघांची पुनर्रचना हा विषय केवळ राजकीय भविष्याचा नसून तो देशाच्या लोकशाही रचनेच्या संतुलनाचा आहे.

या साऱ्या गदारोळात ज्या महिलेसाठी हे सर्व सुरू आहे, ती आजही प्रतीक्षेतच आहे. महिलांना राजकारणात केवळ 'व्होट बँक' म्हणून न पाहता, त्यांना धोरण निश्चितीमध्ये स्थान मिळणे आवश्यक आहे. जेव्हा संसदेत एखाद्या विषयावर २१ तास चर्चा होते, तेव्हा देशाची जनता त्यातून काहीतरी ठोस निष्कर्षाची अपेक्षा करते. मात्र, ५९ वेळा प्रतिपक्षाचे नाव घेऊन होणारी टीका ही समस्या सोडवण्यापेक्षा राजकीय कुरघोडी जास्त वाटते, असा सामान्य मतदाराचा सूर आहे.

सत्तेचे केंद्रीकरण आणि एकाधिकारशाहीला लागलेला हा तडा भाजपसाठी आत्मचिंतनाची वेळ आहे, तर विरोधकांसाठी ही आपली भूमिका अधिक स्पष्टपणे मांडण्याची संधी आहे. २०२७ मध्ये राष्ट्रपती पदाची निवडणूक आणि २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सध्याचे राजकारण फिरत असल्याचे दिसते.लोकशाहीत संवाद आणि सहमती या दोन गोष्टींना सर्वोच्च स्थान आहे. महिला आरक्षण आणि परिसीमन यांसारख्या गंभीर विषयावर बहुमताच्या जोरावर निर्णय घेण्यापेक्षा, सर्व राज्यांना आणि सर्व पक्षांना विश्वासात घेणे सरकारचे कर्तव्य आहे. केवळ आकडेमोडीचे राजकारण न करता, देशाच्या विविधतेला आणि संस्कृतीला बाधा न पोहचवता महिलांना त्यांचा अधिकार देणे, हेच खऱ्या अर्थाने 'राष्ट्रहित' ठरेल. १७ एप्रिलची घटना ही केवळ एका विधेयकाचा पराभव नाही, तर ती लोकशाहीतील 'चेक्स अँड बॅलन्स' जिवंत असल्याचे लक्षण आहे.

# परमार्थात भक्तांचे भगवंतावर शुध्द प्रेम असते: महंत रामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**माळवाडगांव :** संसारात कुणाचं कुणावर प्रेम नसुन फक्त स्वत: वर प्रेम असल्याची प्रचिती कोरोना काळात प्रत्यक्षात अनुभवायला मिळाली.मात्र परमार्थात भक्ती हा मार्ग असा आहे की भक्तांचे भगवंतावर शुध्द प्रेम आहे असा उपदेश महंत रामगिरी महाराज यांनी माळवाडगांव येथील धर्मध्वज पंचदिवशीय किर्तन महोत्सव काल्याचे किर्तनातून भाविकांना उपदेश करताना केला.

श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथे धर्मध्वज चतुर्थ वर्धापन दिन निमित्ताने पंचदिवशीय किर्तन महोत्सव सोहळ्याची भक्तिमय वातावरणात महंत रामगिरी महाराज श्रीक्षेत्र सरालाबेट गोदाधाम यांच्या काल्याचे किर्तनाने मोठ्या उत्साहात सांगता झाली.या सांगता किर्तन प्रसंगी महाराज , विश्वासाचा जनीता म्हणे यशोदेशी माता.... या श्रीकृष्ण चरित्रपर गौळणपर अभंगातून भाविकांना उपदेश करताना पुढे म्हणाले की संसारी माणसं संसारात अनेक दु:ख , अंतर्गत कटकटी,संकटे सहन करून मार्गक्रम करतात.हि एक तपस्याच आहे. आजच्या सद्यस्थितीत जिवनात प्रत्येक मनुष्य व्यस्त झाला आहे.कुणाला कुणाशी प्रेमाने दोन शब्द बोलण्यास वेळ नाही. संसारात सुध्दा कुणाचं कुणावर प्रेम नसुन फक्त स्वत: वर प्रेम आहे.कोरोनाने याची प्रचीती आली.प्रत्यक्षात कोणी कुणाचं नसते स्व:ताचा जीव वाचवण्यासाठी धडपडत होता.म्हणजे फक्त स्वत: च्या शरिरावर वर प्रेम करत होता. परमार्थ हा एकच शुध्द अन् पवित्र मार्ग आहे. भक्तगण भगवंतावर शुध्द अंतःकरणाने प्रेम करत असतात असे शेवटी महाराज म्हणाले.

या किर्तन महोत्सव सोहळ्यास विकास महाराज बनसोडे,माजी लोकनियुक्त सरपंच भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, बाजार समितीचे संचालक गिरीधर आसने, भाजपा तालुका सरचिटणीस डॉ शंकर मुठे, ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब आसने, दादासाहेब चौधरी, सुधीर आसने,सतीष आसने, रावसाहेब काळे,प्रदीप आसने, दादासाहेब अनुसे, अमोल मोरे , यांच्यासह मृदुंग वादक कृष्णा महाराज, गायनचार्य टेकाळे महाराज,बबनराव लटमाळे,प्रमोद आसने, यशवंत हुरूळे भास्कर आसने, बाळासाहेब




आसने आदी भजनी मंडळ उपस्थित होते. शेवटी बाबासाहेब चिडे यांनी हा पंचदिवशीय सोहळा यशस्वी पार पाडण्यासाठी भजनी मंडळ,योगदान, अन्नदान श्रमदान,वर्गणीदारासह सर्वांचे आभार मानले.

## उंदीरगाव ग्रामपंचायतचे सीसीटीव्ही निरुपयोगी पाऊलबुद्धे

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील उंदीरगाव ग्रामपंचायतने सीसीटीव्ही दोन वर्षांपूर्वी बसविले आहे ते निकृष्ट दर्जाचे आहेत गावामध्ये वारंवार चोऱ्या अपघात होत आहे व कोणतेही फुटेज त्यावेळी मिळत नाही मिळाले तर क्वालिटी खराब ...शिवाय सीसीटीव्हीचे बिल पूर्ण निघालेत पण सीसीटीव्ही ला स्क्रीन नाही.सिस्टीम अपूर्ण आहे.या संदर्भात उंदीरगाव ग्रामपंचायत याना लेखी निवेदन दिले १५ दिवस उलटले तरी कोणतीही कार्यवाही अथवा प्रतिक्रिया मिळाली नसल्याचे पवन पाऊलबुद्धे यांनी सांगितले.एक दिवसापूर्वी एका मोटारसायकलचा अपघात होऊन माणसाला आपला जीव गमवावा लागला.मुख्य चौकामध्ये लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही मध्ये वाहनांचे नंबर प्लेट दिसत नाही.माणसांचे चेहरे शरीर दिसत नाही .मागे केबल नंतर इले .मोटर त्यानंतर लोखंड व आता गोमाता चोरी झाल्या आहेत.लहान मुले पळवणाऱ्या अनेक टोळ्या कार्यरत आहे अशा अनेक कारणासाठी व चोऱ्या पकडण्यासाठी चांगल्या दर्जाचे सीसीटीव्ही बसवल्यास नागरिकांची गैरसोय होईल त्यासाठी उंदीरगाव ग्रामपंचायत यांनी वेळीच लक्ष घालून योग्य सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने पवन पाऊलबुद्धे यांनी केली आहे

# संगमनेर महाविद्यालयास 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय' पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**संगमनेर :** शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर नगरपालिका कला, डी. जे. मालपाणी आणि बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहिल्यानगर विभागाकडून दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय' पुरस्कार पटकावला आहे. विशेष म्हणजे, हा मान महाविद्यालयाला आतापर्यंत पाचव्यांदा मिळाला आहे.

महाविद्यालयाने यंदा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांपासून ते 'खेलो इंडिया'पर्यंत यशाची मालिका कायम ठेवत सर्व स्तरांवर आपला ठसा उमटवला. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये ३१० खेळाडूंनी सहभाग घेत २०० हून अधिक सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके जिंकली. ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये १४ खेळाडूंनी प्रतिनिधित्व करत ४ सुवर्ण व १ रौप्य पदक मिळवले.

राष्ट्रीय स्तरावर ७ खेळाडूंनी सहभाग नोंदवून २ सुवर्ण पदके पटकावली, तर राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये ३ सुवर्ण व ३ कांस्य पदके मिळवण्यात यश आले. महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवातही महाविद्यालयाच्या खेळाडूंनी १ सुवर्ण व १ कांस्य पदक जिंकले. 'खेलो इंडिया अस्मिता', ट्रायबल व आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये ५ सुवर्ण व १ रौप्य पदकांची कमाई करत खेळाडूंनी आपली क्षमता सिद्ध केली. सांघिक खेळांमध्येही महाविद्यालयाने वर्चस्व राखत हँडबॉल, योगा, हॉकी, सॉफ्टबॉल, बॉक्सिंग, बेसबॉल आणि कयाकिंगसह १० हून अधिक संघांनी विजेतेपदे पटकावली. क्रिकेट व ॲथलेटिक्समध्ये मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळवत विशेष लक्ष वेधून घेतले. स्पर्धांबरोबरच आयोजनातही महाविद्यालय आघाडीवर राहिले. राज्यस्तरीय १७ वर्षांखालील शालेय कबड्डी स्पर्धा तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविभागीय आणि आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ' जगन्नाथ नरसींगदास कलंत्री क्रीडा भवन' येथे अत्याधुनिक क्रीडा कार्यालय सुरू करण्यात आले असून, बॅडमिंटन, बॉक्सिंग, टेबल टेनिससह विविध इनडोअर खेळांच्या सुविधा खेळाडूंना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांचे नेतृत्व व व्यवस्थापनाचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले. हा पुरस्कार आमच्या क्रीडा संस्कृतीची पोचपावती आहे, असे मत क्रीडा संचालक प्रा. डॉ. अजित कदम यांनी व्यक्त केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव अनिल राठी, जनरल सेक्रेटरी नारायण कलंत्री, क्रीडा संवर्धन समितीचे सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

# राजकीय मतभेद विसरून विकासासाठी एकत्र येण्याचा संदेश

### डॉ. सुजय विखे पाटलांची डॉ. कल्याणी आरणे यांच्या घरी सदिच्छा भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**शिर्डी :** नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीनंतर काही महिन्यांनी स्थानिक राजकारणात एक सकारात्मक आणि घडामोड घडली आहे. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी निवडणुकीत विरोधात उभ्या राहिलेल्या डॉ. कल्याणी आरणे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत संवाद आणि सहकार्याचा नवा संदेश दिला.

या भेटीत डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले की, राजकारण हे वैयक्तिक द्वेषासाठी नसून विकासासाठी असते. प्रचारादरम्यान डॉ. आरणे यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा उल्लेख केला होता, याचा संदर्भ देत त्यांनी समविचारी व्यक्तींना पुन्हा एकत्र आणणे ही संघटनात्मक जबाबदारी असल्याचे नमूद केले. शिर्डीच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसमावेशक राजकारण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच, सामान्य कुटुंबातून पुढे येत वैद्यकीय क्षेत्रात आणि राजकारणात स्वतः चे स्थान निर्माण करणाऱ्या डॉ. कल्याणी



आरणे यांच्या प्रवासाचे त्यांनी कौतुक केले. समाजातील कष्टकरी घटकांमधून नेतृत्व पुढे येणे ही लोकशाहीची ताकद असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली विकासाची दिशा अधिक मजबूत होत असल्याचा उल्लेखही यावेळी डॉ विखे यांनी केला.

डॉ. कल्याणी आरणे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत सांगितले की, दादा अचानक घरी आल्याने आश्चर्य वाटले, मात्र महाराष्ट्राच्या संस्कृतीनुसार पाहुण्याचे आदरातिथ्य करत त्यांनी जेवणाचा आग्रह केला. मोठ्या पदावर असूनही डॉ. विखे यांनी घरच्या साध्या जेवणाचा स्वीकार केल्याबद्दल त्यांनी त्यांच्या साधेपणाचे विशेष कौतुक केले.

या भेटीत केवळ औपचारिकता न राहता नागरिकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. निवडणुकीदरम्यान समोर आलेले विकासाचे मुद्दे त्यांनी मांडले असून, ते मार्गी लागतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजकीय भूमिकेबाबत बोलताना डॉ. आरणे यांनी भारतीय जनता पक्ष हा विचारधारेवर चालणारा आणि संस्कृती जपणारा पक्ष असल्याचे सांगितले. शिर्डीच्या विकासासाठी भाजपसोबत काम करण्याची संधी मिळाल्यास ती स्वीकारण्यास आपण तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाजप एकच आहे, असे ठाम मत व्यक्त करत त्यांनी भविष्यातील सहकार्याचे संकेत दिले.

## शिर्डीत रेल्वेतून आलेले दांपत्य बेशुद्धावस्थेत सापडले

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**शिर्डी :** तिरुपती येथून श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीकडे निघालेल्या एका दांपत्याला साईनगर रेल्वे स्थानकावर बेशुद्ध व गंभीर अवस्थेत आढळून आल्याची धक्कादायक घटना बुधवारी उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित दांपत्य तिरुपती-साईनगर शिर्डी या रेल्वे गाडीने प्रवास करत होते. दुपारी सुमारे १२.२० वाजता गाडी साईनगर रेल्वे स्थानकावर पोहोचली. सर्व प्रवासी खाली उतरल्यावर रेल्वे कर्मचारी गाडी तपासण्यासाठी आत गेले असता, एका सीटवर दोन प्रवासी बेशुद्ध अवस्थेत आढळून आले.

कर्मचाऱ्यांनी त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला; मात्र कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आरपीएफचे अधिकारी कनौजिया व फूड हेल्थ निरीक्षक रिंकी सहारे यांनी तत्काळ त्या दोघांना शिर्डी येथील साईबाबा रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान, प्राथमिक चौकशीत संबंधितांची नावे लोकय्या व अरुणा अशी समोर आली आहेत. रेल्वे प्रवासादरम्यान त्यांना गुंगीचे औषध देण्यात आले की त्यांनी सोबत आणलेल्या अन्नातून विषबाधा झाली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दोघे पूर्णपणे शुद्धीवर आल्यानंतरच घटनेमागील नेमके कारण समोर येण्याची शक्यता आहे.या घटनेमुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पुढील तपास सुरू आहे.

## रविवारी हरेगाव येथे सर्वपंथीय वधू वर परिचय मेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील संत तेरेजा चर्च मतमाउली भक्तीस्थान येथील सभागृहात येत्या रविवारी दिनांक २६ एप्रिल रोजी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत प्रगत पदवीधर संघटना पुरस्कृत स्नेहवर्धिनी सर्वपंथीय वधूवर सूचक मंडळ यांचा ८८ वा परिचय मेळावा प्रमुख धर्मगुरू रे फा डॉमनिक रोझारिओ यांच्या अध्यक्षतेखाली व फा.संतान रॉड्रीग्ज ,प्रमुख व पर्यवेक्षक संत तेरेजा हायस्कूल फा ,फ्रँसिस ओहोळ ,अध्यक्ष अंतोन त्रिभुवन , सचिव रमेश बनसोडे . विनायक त्रिभुवन ,व स्नेहवर्धिनी अहिल्यानगर जिल्हा विभागीय कमिटीचे अध्यक्ष विजय त्रिभुवन ,सेक्रेटरी सतीश पाटोळे खजिनदार ज्यो दिवे, रत्नाकर दोंदे. आदी सर्व पदाधिकारी ,संत तेरेसा चर्च प्रतिनिधी सुभाष पंडित , डी एस गायकवाड ,सुनील साठे ,बीजी पारधे ,विलास साळवे सुनील साळवे आदी मान्यवर उपस्थित राहणार असून परिसरातील सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे .संपर्क ज्यो दिवे मो.क्र .८०५५३२३२६७ यांचेशी करावा.

# रामराव आदिक स्कूलमध्ये जागतिक पुस्तक दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**श्रीरामपूर:** अशोकनगर येथील रामराव आदिक पब्लिक स्कूल मध्ये जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे प्रदर्शन मांडले होते. विविध विषयांवरील पुस्तके कथा, कादंबऱ्या, विज्ञान, इतिहास, आत्मचरित्रे यामुळे संपूर्ण परिसर ज्ञानाच्या सुवासाने भरून गेला. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या पुस्तकांबद्दल



मनोगत व्यक्त केले, तर काहींनी पुस्तकांतील प्रेरणादायी प्रसंग कथन करून सर्वांना विचार करायला भाग पाडले.

कार्यक्रमाची सुरुवात पुस्तक पूजनाने करण्यात आली. शिक्षकांनी पुस्तकांचे महत्त्व सांगताना, पुस्तक हे माणसाचे खरे मित्र आहे हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला. या निमित्ताने वाचन संस्कृती जपण्याचा आणि दररोज वाचनाची सवय लावण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.

प्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली असून, पुस्तकांप्रती प्रेम वाढवण्याचा महत्त्वाचा संदेश देण्यात आला. असा हा ज्ञानाचा उत्सव विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रेरणादायी ठरला.

## जि. प्र प्रा शाळा सिरजगाव वस्ती येथे बालगोपाळांना निरोप

**गंगापूर :** हिमालयाला गवसनी घालणारे पंख मिळू दे, पंखाना गरुडाची शक्ती मिळू दे, क्षितिज पलीकडे झेप घेण्यासाठी पंख पसरून घे उतुंग भरारी जि. प्र प्रा शाळा सिरजगाव वस्ती येथे बालगोपाळांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देत निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण काळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून इजी. सचिन काळे ( माजी विद्यार्थी )उपाध्यक्ष तुकाराम आघाडे (मा. सरपंच )तसेच जेष्ठ नागरिक काकासाहेब सिरसाट, अशोक सिरसाट, बापू सिरसाट उपस्थितहोते .कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेंद्र बोल्डे (मुख्यध्यापक /शिक्षक सेना तालुका प्रमुख ) फुलारी यांच्यासह पालकवर्ग यांनी परिश्रम घेतले.



# वाद मिटवणाऱ्या इसमावर चाकूने हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**राहुरी :** किरकोळ वाद मिटविण्यासाठी गेलेल्या इसमावर चाकूने प्राणघातक हल्ला केल्याची घटना दि. १९ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली. ही घटना राहुरी तालुक्यातील उंबरे येथे घडली आहे.




या बाबत मिळालेल्या माहितीनुसार, जखमी अजय दगडू पंडीत, रा. उंबरे, ता. राहुरी हे आपल्या कुटुंबासह राहून मजुरी करून उदरनिर्वाह करतात. दि. १९ एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास अजय पंडीत यांचा भाचा स्वप्निल चक्रनारायण आणि आतिष उर्फ दाद्या गायकवाड यांच्यात वाद सुरू होता. हा वाद सोडवण्यासाठी अजय पंडीत घटनास्थळी गेले असता तेथे रोहन प्रकाश धोत्रे व प्रकाश बाबुराव धोत्रे हेही उपस्थित होते. वाद शांत करण्याचा प्रयत्न करत असताना आरोपींनी अजय पंडीत यांना शिवीगाळ सुरू केली. त्याच वेळी आतिष गायकवाड याने गावठी कट्टा काढून धमकावले. यानंतर परिस्थिती अधिक चिघळली. रोहन धोत्रे याने संतापाच्या भरात अजय पंडीत यांच्या पोटात चाकूने वार केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत अजय पंडीत यांना प्रथम राहुरी पोलीस ठाण्यात नेण्यात आले, त्यानंतर ग्रामीण रुग्णालय राहुरी येथे प्राथमिक उपचार करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले. अखेर नातेवाईकांनी त्यांना एका खाजगी रुग्णालयात दाखल केले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी अजय पंडीत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रोहन प्रकाश धोत्रे, आतिष गायकवाड आणि प्रकाश बाबुराव धोत्रे, सर्व रा. उंबरे, ता. राहुरी यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# गुंजाळे येथे तरुणावर कुऱ्हाडीने हल्ला; एक जखमी, गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील गुंजाळे येथे किरकोळ वादातून एका तरुणावर कुऱ्हाडीने हल्ला करून जखमी केल्याची घटना १९ एप्रिल रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी तिघांसह ८ ते १० अनोळखी व्यक्तींविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ओंकार गिताराम आल्हाट (वय १९, रा. जय मल्हारनगर, शेंडी बायपास, नवनागापूर एमआयडीसी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दोन दिवसांपूर्वी विकास सरोदे (रा. गुंजाळे) याच्याशी किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यानंतर वाद मिटविण्याच्या बहाण्याने आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांना गुंजाळे येथे बोलावले. दि. १९ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता फिर्यादी ओंकार आल्हाट, त्यांचे वडील गिताराम आल्हाट, चुलत भाऊ अजिंक्य आल्हाट व नातेवाईक



रोहित जाधव हे गुंजाळे येथे गेले. चर्चजवळ पोहोचताच विकास सुदाम सरोदे, यश किरण सरोदे, सुदाम सरोदे तसेच अन्य ८ ते १० जणांनी त्यांना शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. दरम्यान, विकास सरोदे याने हातातील कुऱ्हाडीने गिताराम आल्हाट यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ओंकार आल्हाट वडिलांना वाचवण्यासाठी पुढे सरसावले असता कुऱ्हाडीचा फटका त्यांच्या डोक्याजवळ बसून ते जखमी झाले. यानंतर इतर आरोपींनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत पुन्हा गावात आलात तर जिवे मारू, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमींना तात्काळ राहुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर फिर्यादीने राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.या प्रकरणी आरोपी विकास सुदाम सरोदे, यश किरण सरोदे, सुदाम सरोदे व इतर अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# बाभळेश्वरचे कृषी विज्ञान केंद्र राज्यात अव्वल...

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणीत यश; प्रशिक्षणातून प्रत्यक्ष कृतीतून शिक्षणांवर भर..




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत ग्रामीण भागात उद्योग उभारणीस चालना देण्यामध्ये बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. शेतकरी, महिला बचत गट व युवकांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण देऊन स्वावलंबनाकडे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केंद्राने यशस्वीरित्या पार पाडले आहे. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण दिल्याने याची व्याप्ती अधिकच वाढली. अहिल्यानगर जिल्हात जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील,भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील आणि जिल्हा परिपदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालीनीताई विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पायरेन्सच्या कृषी विज्ञान केंद्राने गेल्या वर्षभरात १२ प्रशिक्षणांतून २९१ शेतकरी,महिला आणि युवकांना विविध अन्न प्रक्रिया उद्योगांवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले. फळ-भाज्या प्रक्रिया, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, मसाला प्रक्रिया, पापड-लोणची तयार करणे, बेकरी उत्पादन यांसारख्या क्षेत्रात शेकडो लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे अनेकांनी स्वतःचे सूक्ष्म उद्योग सुरू करून रोजगारनिर्मिती केली आहे. योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना केवळ प्रशिक्षणच नव्हे तर प्रकल्प अहवाल तयार करणे, बँक कर्ज मिळवणे, शासकीय अनुदान मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, तसेच उत्पादनाचे ब्रँडिंग व मार्केटिंग याबाबतही सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे उद्योग उभारणीची संपूर्ण साखळी सुलभ झाली आहे. केंद्राच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झाली असून, अनेक महिला बचत गटांनी उद्योग सुरू करून आर्थिक सबलीकरण साधले आहे.

युवकांनाही स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाल्याने स्थलांतराचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. केंद्राच्या ह्या उपक्रमाचे कृषी प्रक्रिया आणि नियोजन विभागाचे नोडल अधिकारी विनयकुमार आवटे यांनी विशेष अभिनंदन केंद्राचे केले आहे. केंद्राच्या पातळीवरती संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, शैलेश देशमुख, शांताराम सोनवणे, डॉ. विलाह घुले, डॉ. प्रियंका खर्डे, सज्जला लांडगे आणि डॉ. विठ्ठल विखे यांनी विशेष प्रयत्न करून शेतमालाला योग्य दर मिळावा आणि त्यातून मूल्यवर्धन व्हावे, हा आमचा प्रमुख उद्देश आहे.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या माध्यमातून आम्ही ग्रामीण भागात उद्योजक तयार करत आहोत. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कृषी विभाग व संबंधित यंत्रणांकडून कृषी विज्ञान केंद्राचे कौतुक होत असून, इतर जिल्ह्यांसाठीही बाभळेश्वरचे मॉडेल मार्गदर्शक ठरत आहे. भविष्यात अधिकाधिक शेतकरी व युवकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

> केंद्राच्या माध्यमातून कृषी उद्योजकता अभियान राबवण्यावरती केंद्राने सुरुवातीपासूनच भर दिला आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी महिला युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना व्यावसायिक बनवण्याबरोबरच त्यांना प्रशिक्षणानंतरही विविध सेवा सुविधा दिल्यामुळे आज या योजनेमध्ये कृषी विज्ञान केंद्र हे अव्वल स्थानावर राहून राज्यात एक वेगळे स्थान या योजनेमध्ये बाभळेश्वरच्या कृषी विज्ञान केंद्राने निर्माण केले आहे.
> **डॉ. सुप्रिया ढोकणे, मुख्य कार्यकारी अधिकारी**

## द•ख•ल

### कांगोनीत महिला आघाडीच्या वतीने डॉ. आंबेडकर जयंती साजरी



**शनिशिंगनापूर** : नेवासा तालुक्यातील कांगोणी येथे भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रिपब्लिकन सेना महिलाआघाडीच्या वतीने मोठया उस्थाहत करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांना सन्मानित करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राजाभाऊ आढाव, जिल्हा उपाध्यक्ष भारत भांबळ,छानदान शेत्रे,भानुदास जाधव,विशाल खरात, किरण खरात, महिला आघाडीचे प्रमुख वैशाली गायकवाड,उपप्रमुख कुसुमबाई पंडित, जयाताई ढगे, प्रतिभा वडागळे,शोभा पंडित, अंजली गायकवाड, सरला गायकवाड, सविता जाधव,विजया जावळे,नंदाताई पंडित, मुक्ता वडागळे, सह सरपंच सोमनाथ कराळे, सेवा सोसायटीचे माजी अध्यक्ष दुर्योधन सोनवणे, शिवाजी शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष माउली सोनवणे,बाळासाहेब रौदळ, व वसंत वडागळे उपस्थित होते.

### डॉ. पिपाडा यांनी घेतली महंत भास्करगिरी महाराज यांची भेट



**शिर्डी** :नेवासा तालुक्यातील देवगड येथील महंत भास्करगिरीजी महाराज यांच्या मातोश्रींच्या निधनाने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. या दुःखद प्रसंगी राहाता नगरपालिकेच्या माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा ममता पिपाडा व भाजपाचे नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी देवगड येथे भेट देऊन महंत भास्करगिरीजी महाराज यांची सांत्वनपर भेट घेवुन आपल्या संवेदना व्यक्त केल्या. यावेळी पिपाडा दाम्पत्यांनी महाराजांशी संवाद साधत त्यांच्या दुःखात सहभागी होत श्रद्धांजली अर्पण केली. तसेच, देवगड परिसराच्या विकासासाठी झालेल्या विविध कामांच्या आठवणींनाही उजाळा देण्यात आला. विशेषतः देवगड येथील पाणी योजनेच्या संदर्भात महत्त्वपूर्ण पाठपुरावा करून त्या काळातील राज्याचे गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांना प्रत्यक्ष स्थळी आणून सदर पाणी योजनेला मंजुरी मिळवून दिल्याची आठवण महंत भास्करगिरीजी महाराज यांनी कृतज्ञतेने व्यक्त केली. डॉ. राजेंद्र पिपाडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे देवगडसारख्या धार्मिक व ग्रामीण भागात मूलभूत सुविधांच्या उभारणीस गती मिळाली असल्याचेही यावेळी महंतांनी चर्चेदरम्यान अधोरेखित केले.

# माका येथील शृंगऋषीगडाच्या दुसऱ्या नारळी सप्ताहास आजपासून सुरुवात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**





**बालाजी देडगाव** : माका (ता. नेवासा) येथे श्री क्षेत्र श्रृंगऋषीगडाचा दुसरा नारळी सप्ताह वै. गुरुदेव शांतीब्रम्ह तुकाराम बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त आज (दि. २४) मोठ्या उत्साहात सुरू झाला. हभप महंत गुरुवर्य सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून तो १ मे २०२६ पर्यंत चालणार आहे. या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी व रात्री कीर्तन, दुपारी श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ व रात्री हरिकिर्तनानंतर जागर असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दुपारच्या सत्रात ह.भ.प गणेश महाराज वारंगे यांची भागवत कथा होणार असून सकाळी व रात्री नामवंत कीर्तनकारांची सेवा भाविकांना लाभणार आहे. ज्ञानेश्वर महाराज तांबे, राम महाराज झिंजुर्के, भागवत महाराज शास्त्री, जनार्दन महाराज, लक्ष्मण महाराज कदम यांसह अनेक कीर्तनकारांची उपस्थिती या सप्ताहात राहणार आहे. समारोपाच्या दिवशी (१ मे) सुरेशानंदजी महाराज यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे माका व परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून मोठ्या संख्येने भाविक सहभागी होत आहेत. आयोजकांनी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## भीमजयंती उत्सवानिमित्त श्रीरामपूरमध्ये भव्य चित्रकला स्पर्धा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त श्रीरामपूर शहरात कला आणि विचारांची सुंदर सांगड घालणारा उपक्रम राबविण्यात येत आहे. रंगलहरी आर्ट कॅडमी, सक्षम फाउंडेशन आणि सिद्धार्थनगर युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना वाव देण्याची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे. ही चित्रकला स्पर्धा शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते १ या वेळेत लुंबिनी बुद्ध विहार, रेल्वे स्टेशन समोर, श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. तसेच स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण समारंभ रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती रंगलहरी आर्ट कॅडमीचे संचालक चित्रकार रवी भागवत यांनी दिली. स्पर्धेचा विषय माझ्या आवडत्या महापुरुषाचे चित्र असा ठेवण्यात आला असून, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या महापुरुषाचे विचार आणि व्यक्तिमत्व रंगांच्या माध्यमातून साकार करायचे आहे. स्पर्धा दोन गटांमध्ये विभागण्यात आली आहे. लहान गट हा पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी असून, मोठा गट दहावी पुढील सर्वांसाठी खुला ठेवण्यात आला आहे. सहभागी स्पर्धकांसाठी रोख पारितोषिके देण्यात येणार असून सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याची माहिती सक्षम फाऊंडेशनचे सुशील पठारे यांनी दिली. स्पर्धेसंदर्भात काही महत्त्वाच्या सूचना देखील आयोजकांनी दिल्या आहेत. चित्रकलेसाठी लागणारा कागद आयोजकांकडून पुरविण्यात येणार असून, इतर सर्व साहित्य जसे की रंग, ब्रश, पॅड इत्यादी विद्यार्थ्यांनी स्वतःसोबत आणणे आवश्यक आहे. चित्राचा आकार -३ साईज ठेवण्यात आला असल्याची माहिती अमोल मिसाळ यांनी दिली. श्रीरामपूर शहर व तालुक्यातील सर्व विद्यार्थी, तरुण तसेच कला प्रेमींनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन चित्रकार रवी भागवत, सक्षम फाऊंडेशनचे सुशील पठारे व अमोल मिसाळ यांनी केले आहे. नाव नोंदणी रंगलहरी आर्ट अकॅडमी, साई सुपर मार्केट, शहा ब्रदर्स मागे, जैन मंदिराजवळ, मेन रोड, श्रीरामपूर येथे सुरू आहे.

## एम ए अर्थशास्त्र विभागात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल गोविंद आसने यांचा बोरावके महाविद्यालयाच्या वतीने सन्मान




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथील गोविंद शरद आसने या विद्यार्थ्यांने रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयात एम ए अर्थशास्त्र विभागात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मिनाताई जगधने व कवी संदीप जगताप यांच्या शुभहस्ते पुरस्कार सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शेतकरी कुटुंबातील गोविंद आसने या विद्यार्थ्यांने आपल्या आई वडिलांना शेती कामात हातभार लावून एम ए पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शेतीबरोबरच अभ्यासात सदैव मेहनत घेतल्याने त्याने एम ए अर्थशास्त्र विभागात प्रथम क्रमांक पटकावला. गोविंदची पदवीधर बहिण कु.तप्ती शरद आसने हीभोकर येथे पोस्ट कार्यालयात कार्यरत आहे.हा कार्यभार सांभाळत असताना कु.तप्ती हिने, केंद्र सरकारच्या पोस्ट विभागातील मल्टी- स्टाकींग स्टाफ ची एम टी एस ही परीक्षा देऊन उत्तीर्ण झाली.नुकतीच तीची मुंबई छत्रपती टर्मिनल कार्यालयात पोस्टींग झाली आहे. अँड अजित काळे यांचे खंदे समर्थक,शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष शरद आसने यांचे गोविंद चिरंजीव व तप्ती कन्या आहे. या भावंडांचे यशाबद्दल श्रीरामपूर तालुका जिल्हा शेतकरी संघटनेचे पदाधिकाऱ्यासह माळवाडगाव मुठेवाडगांव भोकर खानापूर भामाठाण पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कौतुक केले आहे.

# पाण्याचे बाष्पीभवन कमी करणाऱ्या उपाययोजना राबविण्याची गरज : सुखदेव फुलारी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**भेंडा** : बाष्पीभवनामुळे शेती व शेततळी यातील पाणी मोठ्या प्रमाणात वाया जाते. ते वाचविण्यासाठी पाण्याचे बाष्पीभवन कमी करणाऱ्या उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जलसाक्षरता केंद्र यशदाचे जिल्हा समन्वयक जलमित्र सुखदेव फुलारी यांनी केले. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या मुळा पाटबंधारे विभागाचे वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त गुरुवार दि.२३ एप्रिल रोजी भेंडा येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाचे सभागृहात आयोजित पीक पद्धतीबदल, उत्पादकता वाढ व पाण्याचे नियोजन या विषयावरील शेतकरी परिसंवादामध्ये 'पाणी बचतीत शेतकऱ्यांचा सहभाग' याविषयावर मार्गदर्शन करतांना फुलारी बोलत होते.

मुळा पाटबंधारे विभागाचे उपअभियंता संदीप पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोकराव मिसाळ, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राहुल पाटील, सहाय्यक कृषी अधिकारी गणेश अटक, प्रगतशील शेतकरी भाऊराव आगळे, डॉ.भास्कर तात्कटे, विरसेन पवार, किशोर मिसाळ, मंगेश नवले,नेवासा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अभिषेक पवार, चिलेखनवाडी उपविभागाचे उपविभागीय अधिकारी स्वप्नील देशमुख हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे व जलकलशाचे पूजन करण्यात आले. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली कालवा निरीक्षक रावण ससाणे यांनी जलगीत सादर केले.

फुलारी पुढे म्हणाले की, नागरिकरण औद्योगिक आणि सिंचन यामध्ये शेतकरी हा सर्वात मोठा पाणी वापरकर्ता आहे. पाणी नसेल तर शेती नाही आणि शेती नाही तर अन्नधान्य उत्पादन ही नाही. त्यामुळे कालवा आणि भूजल यांच्या माध्यमातून शेतीला उपलब्ध होणारे पाणी काटकसरीने वापरण्याची गरज आहे. पिकाला प्रवाही पाणी देण्याची पारंपरिक पद्धत बदलून सूक्ष्म सिंचन केल्यास ४० टक्के पाण्याची बचत होते. त्याच बरोबर पिकाला दिलेल्या प्रवाही पाणी आणि शेततळ्यात साठवलेल्या पाण्याचे ५० टक्क्यांपर्यंत बाष्पीभवन होऊन मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असते. ते वाचविण्यासाठी शेतामध्ये आणि शेततळ्यावर पाण्याचे बाष्पीभवन करणाऱ्या वेगवेगळ्या उपाययोजना करण्याची गरज आहे. एकरी १०० टन ऊस उत्पादनाची यशोगाथा सांगतांना प्रगतशील शेतकरी भाऊराव आगळे म्हणाले की, व्यवसायिक दृष्टिकोन ठेवून शेतीमध्ये काळा नारो बदल करण्याची गरज आहे. शेतकऱ्याला शेतातील पिकाशी बोलता आले पाहिजे, काय कमतरता आहे हे समजले पाहिजे. जमिनीची योग्य मशागत, बेणे प्रक्रिया, रासायनिक औषधांची फवारणी व रासायनिक खतांचा कमीत कमी वापर करून कंपोस्ट व जैविक खतांचा वापर केल्यास एकरी १०० टन ऊस उत्पादन शक्य आहे.

फळबाग व्यवस्थापन या विषयावर बोलताना सहाय्यक कृषी अधिकारी गणेश अटक म्हणाले की, खरीप व रब्बी हंगामातील पिकांमधून अपेक्षित उत्पादन मिळत नाही, म्हणून फळबाग हा उत्तम पर्याय आहे. फळबागेत एकदाच गुंतवणूक करून दीर्घकाळ उत्पन्न मिळवता येते. मुळा पाटबंधारे विभागाचे शाखाधिकारी बिरबल दरवडे, जितेंद्र कावले, प्रवीण नागपुरे कावले, कालवा निरीक्षक श्रीकांत करंजे, सुनील तुपे, प्रवीण नागपुरे, नितीन लांडे, ज्ञानदेव पाडळे, बाबुराव म्हस्के, लहू खाटीक, योगेश फुलारी, आदीसह मुळा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. उपस्थित शेतकऱ्यांना ज्ञानेश्वर कृषी विज्ञान केंद्राच्या माती-पाणी परीक्षण व जैविक प्रयोगशाळेला भेट देण्यात आली. त्यामध्ये डॉ. भास्कर तात्कटे, व विजय गव्हाणे यांनी शेतकऱ्यांना प्रयोगशाळेबाबत माहिती दिली.

मुळा पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी स्वप्निल देशमुख यांनी प्रस्ताविक केले. कालवा निरीक्षक संतोष राऊत यांनी सूत्रसंचालन केले. रजपूत यांनी उपस्थितांना जलप्रतिज्ञा दिली. शाखाधिकारी प्रदीप खर्से यांनी आभार मानले.

# ईडीच्या निकालाचा व पोटनिवडणुकीचा संबंध नाही !

## मी राष्ट्रवादीच : प्राजक्त तनपुरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राज्याचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यावर मनी लॉन्ड्री प्रकरणी ईडीने दाखल केलेल्या दोषारोपातून ईडी न्यायालयाने या केसमध्ये तथ्य नसल्याचे सांगत प्राजक्त तनपुरे यांना दोष मुक्त करून दिलासा दिला आहे. या प्रकरणी प्राजक्त तनपुरे यांनी आपली प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले आहे की, मी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातच आहे, कालही होतो आजही आहे. मी भाजपमध्ये गेलो असे कधीही मी म्हणालो नाही मी कुठल्या स्टेजवर गेलो नाही. स्थानिक प्रश्नासाठी मी या निवडणुकीतून माघार घेतलेली आहे.

ही निवडणूक राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारी नव्हती मी काही पक्ष सोडलेला नाही व कुठल्या पक्षातही प्रवेश केलेला नाही. तालुक्यातल्या स्थानिक कार्यकर्त्यांना मी मोकळीक दिली होती त्यांनी स्थानिक प्रश्न हाताळून निर्णय घेण्याचे आवाहन मी त्यांना केले होते. मी भाजप मध्ये जाण्याचा कुठेही प्रश्न येत नाही मी फक्त या निवडणुकीपुरते थांबण्याचा निर्णय घेतलेला आहे. ईडीच्या कारवाईत राज्यातील सुमारे ५० ते ६० जणांचा समावेश होता. त्यामुळे माझ्या ईडीच्या निकालाशी निवडणुकीचा संबंध जोडला जातो हे म्हणणे योग्य नाही. ईडीच्या निकालाचा व निवडणुकीचा काहीही संबंध नाही एक वर्षापूर्वीच आर्थिक गुन्हे शाखेने क्लोजर रिपोर्ट देऊन क्लीन चीट दिली होती. व त्या गुन्ह्यामध्ये पुढील तपास ईडीला करता येणार नाही असे स्पष्ट केले परंतु काही तांत्रिक कारणामुळे त्याचा निकाल काल लागला.

त्यामुळे निवडणुकीचा व या निकालाचा दुरान्वये काहीही संबंध नाही. एक वर्षापूर्वी आमदार शिवाजीराव कर्डिले हयात होते त्यामुळे निवडणुक लागणार हा विषयच नव्हता. त्यामुळे मी कुठल्या पक्षात जाणार आहे या केवळ वल्गना आहेत. मी कालही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात होतो आणि आजही आहे.

मी शरदचंद्र पवार साहेबांचा कार्यकर्ता असल्याचे सांगून ईडीचा निकालाचा व निवडणुकीचा काहीही संबंध नसल्याचे प्राजक्त तनपुरे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांचा भाजपा प्रवेश होणार या सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे.

# नेवाशातील बिघडलेल्या कायदा सुव्यस्थामध्ये सुधारणा करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई/शनिशिगंनापूर** : नेवासा तालुक्यातील वाढते अवैध धंदे, पोलीस विभागाची आकार्यक्षमता व भ्रष्टाचार याविरोधात आज काँग्रेसने नेवासा पोलीस निरीक्षकाना निवेदन दिले. सविस्तर वृत्त असे की, नेवासा तालुक्यात अवैध धंद्याच्या माध्यमातून दोन नंबरवाल्यानी डोके वर काढले आहे. यात प्रवरा, गोदावरी नदीतून वाळू उपसा ज्यामुळे गुन्हेगारी वाढली आहे, गल्लोगल्ली सुरु असणारा मटका व्यवसाय, राजरोसपणे सुरु असणारा गुटखा व्यवसाय, अवैध दारू पाडणे व विक्री,गांजा विक्री,श्रीरामपूर नेवासा व नगर -संभाजी नगर महामार्गवरील रोड-रोबरी, यात डिजल चोरी, सोने दागिने चोरी, या व्यतिरिक्त लॉजिंगवर चालणारा वेश्या व्यवसाय असे अनेक अवैध धंद्यानी तालुक्यात जोर पकडला आहे. तर यावर पोलीस प्रशासनाने अंकुश ठेवण्याऐवजी पोलीसच यात सामील असल्याची चर्चा तालुक्यात आहे. पोलिसांचे गुन्हेगारांशी आर्थिक हितसंबंध असून यातून गुन्हेगारांचे फावत आहे. तर नेवासा पोलीस निरीक्षकांची नेवासा पोलीस स्टेशनवर पकड राहिलेली नाही ही चर्चा तालुक्यात असून कर्मचारी निरीक्षकाचे ऐकत नाही अशीही चर्चा आहे.गुन्ह्याचा आलेख कमी करण्यासाठी पोलीस ठाण्याकडून गंभीर गुन्ह्यात देखील फक्त एनसी दाखल करून गुन्हेगारांना अभय देण्यात येत आहे. यामुळे गुन्ह्याचा आलेख उंचावला आहे.याबाबत नेवासा काँग्रेस कडून दखल घेत तात्काळ कारवाई करून सर्व अवैध धंद्याना आळा घालावा व तालुक्यातील कायदा सुव्यवस्था मध्ये सुधारणा करावी अशी मागणी निवेदणाद्वारे करण्यात आली.

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी मिरजगाव ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री./श्रीम/कु. बाबासाहेब बाजीराव कांबळे, रा. मिरजगाव ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांनी त्यांच्या नामे उषा बाबासाहेब कांबळे याचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

सदरील व्यक्तीचा जन्म मिरजगाव ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी दि.०९/०४/१९८५ रोजी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणेसंबंधी दि. १८/१२/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तींच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार कर्जत**
**अहमदनगर**
**दि.०५/०२/२०२६**

## पान १ वरुन

### माझ्या पतीने गंभीर गुन्हा केला असेल, पण माझा सहभाग नाही

कोणताही महत्त्वाचा कागद किंवा पुरावा नाही याकडेही बचाव पक्षाने न्यायालयाने लक्ष वेधले. तपासी अधिकारी पोसई निवांत जाधव यांनी न्यायालयाला माहि ी देताना सांगितले की कल्पना खरात यांच्या खात्यात तब्बल सात कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. त्या कोणतीही नोकरी किंवा व्यवसाय करत नसताना एवढी मोठी रक्कम खात्यात कशी आली, याचा तपास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. सरकारी पक्षाने आणखी एक मुद्दा मांडताना सांगितले की, पावर ऑफ अटर्नीमध्ये फक्त खरेदीचा अधिकार देण्यात आला होता. मात्र दस्त आणि पावर ऑफ अटर्नी एकाच दिवशी तयार करूनही खरेदीखत दोन दिवसांनी का करण्यात आले, याबाबत संशय व्यक्त करण्यात आला. कल्पना खरातच्या वतीने कोर्टात युक्तिवाद केला की, 'माझ्या पतीने गंभीर गुन्हे केले आहेत सध्या मीडिया ट्रायल सुरू असून कोणत्याही परिस्थितीत मला अटक करण्याचा डाव आहे. माझा मुलगा १८ वर्षांचा आहे. मला एक मुलगी आहे. माझे पती तुरुंगात आहे. ते बाहेर येतील की नाही मला माहीत नाही. आता कुटुंबाची काळजी मलाच घ्यायची आहे. मी रोज हजेरीसाठी येण्यास तयार असून मी कुठेही पळून जाणार नाही . संबंधित जमीन खरेदी व्यवहारात कल्पना खरातचा थेट सहभाग नव्हता. कल्पना चर्चेच्या प्रक्रियेतही सहभागी नव्हत्या, तसेच त्यांनी कोणाकडूनही व्याजाची रक्कम मागितलेली नाही .काही आर्थिक व्यवहार केले असले तरी ते त्यांच्या पतीच्या सांगण्यावरून केले होते. त्या व्यवहारामागील उद्देश किंवा स्वरूप त्यांना माहिती नव्हते, असा दावा करत अटकपुर्व जामीन देण्याची मागणी केली . मात्र न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला असून आता त्या उच्च न्यायालयात दाद मागणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत सात उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद !

प्रसाद तनपुरे, डॉ उषाताई तनपुरे,माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांनी लोकशाही पद्धतीने मतदान करण्यासाठी मतदारांना आवाहन केले. पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडण्यासाठी सुरुवातीपासूनच कडे कोट पोलीस बंदोबस्त ठेवल्यामुळे किरकोळ अनुचित प्रकार वगळता कुठेही बाधा आलेली नाही. मतदान प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी ठिकठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आलेला होता. दरम्यान उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत चालला असल्याने उन्हामुळे मतदानात घट होऊ नये म्हणून व मतदानाची आकडेवारी वाढावी यासाठी प्रशासनासह उमेदवारांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी भर उन्हात जास्तीत जास्त मतदान घडवून आणण्याचा प्रयत्न केला. काल मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. आता मतमोजणी चार मे रोजी होणार असल्याने दहा दिवसाच्या कालावधीत सर्वच कार्यकर्त्यांच्या पैजा लागला असून आमचाच उमेदवार विजयी होणार असल्याचा दावा ते करीत आहेत.मात्र काल सात उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाल्यानंतर चार मे रोजी निवडणुकीचा निकाल लागल्यानंतरच गुलाल अंगावर कोण घेणार याची उत्सुकता सर्वांनाच लागलेली आहे.

### मंत्री विखे-पाटलांचे जरांगे-पाटलांच्या आरोपांना प्रत्युत्तर

जरांगे पाटील यांनी विखे पाटील यांना अध्यक्षपदावरून हटवण्याची मागणी केली होती. त्यावर भाष्य करताना ते म्हणाले, या समितीचा अध्यक्ष मीच असावा असा माझा कोणताही अट्टाहास नाही.
दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी काल विखे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले होते. विखे पाटलांच्या कार्यकाळात नोंदी शोधणे आणि प्रमाणपत्र देण्याचे काम ठप्प झाले आहे, अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली होती. या आरोप-प्रत्यारोपामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा तापला असून शासन आणि आंदोलक यांच्यातील समन्वय कसा राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'एसआयआर'मध्ये संगमनेरचे काम उत्कृष्ट : खा. ज्योती वाघमारे

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**संगमनेर** : बांगलादेशी मतदार कमी करणे आणि आपल्या हक्काचे मतदार वाढविण्याच्या उद्देशाने 'एसआयआर' अंतर्गत सुरू असलेले काम संगमनेर विधानसभा मतदारसंघात अत्यंत प्रभावीपणे राबविले जात असून, सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये संगमनेरचे काम उत्कृष्ट ठरत असल्याचे मत शिवसेनेच्या संपर्कप्रमुख तथा खासदार ज्योती वाघमारे यांनी व्यक्त केले.

संगमनेर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आमदार अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात पार पडली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना खा. वाघमारे म्हणाल्या की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आमदार अमोल खताळ यांनी मतदारसंघात मोठ्या प्रमाणात निधी आणून सर्वसामान्यांची कामे मार्गी लावली आहेत. त्यामुळे जनतेमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' हे धोरण पक्ष राबवत आहे. निवडणुकांच्या काळातच नव्हे, तर संकटाच्या प्रत्येक क्षणी शिवसेना जनतेच्या पाठीशी उभी राहते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, 'घर तेथे शिवसैनिक आणि गाव तेथे शिवसेना शाखा' या धोरणाच्या माध्यमातून संघटन अधिक मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. शासनाच्या लोककल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, संकटात मदतीला धावून जाणे आणि महिलांचे सक्षमीकरण यासाठी शिवसेना सातत्याने कार्यरत आहे.

या बैठकीस आमदार अमोल खताळ, माजी खासदार सदाशिव लोखंडे, जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, महिला जिल्हाप्रमुख सुनीता शेळके, सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ, युवासेना जिल्हाप्रमुख शुभम वाघ, तसेच विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन मंजाबापू साळवे यांनी केले, तर आभार रामभाऊ रहाणे यांनी मानले.

**कार्यकर्त्यांची ताकद वाढवा : माजी खा. सदाशिव लोखंडे**

जुन्या व नव्या शिवसैनिकांना एकत्र आणून संघटना मजबूत करणे गरजेचे आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना बळ द्यावे, असे आवाहन माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी केले.

**सक्रिय कार्यकर्त्यांनाच पदांची जबाबदारी : आ. अमोल खताळ**

शिवसेनेचे पदाधिकारी कायम असून कुणालाही हटविण्यात आलेले नाही. मात्र 'घर तेथे शिवसैनिक, गाव तेथे शाखा' हे अभियान राबवून संघटना अधिक मजबूत करण्यात येईल. यापुढे पक्षासाठी सक्रियपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच पदांची जबाबदारी दिली जाईल. काम न करणाऱ्यांवर कारवाई होईल, असे आमदार अमोल खताळ यांनी स्पष्ट केले.



**संगमनेर ठरणार भक्कम बालेकिल्ला : कमलाकर कोते**

शिर्डी लोकसभा मतदारसंघात संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी विविध स्तरांवर बैठका घेतल्या जात आहेत. आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून झालेली विकासकामे तळागाळापर्यंत पोहोचवून संगमनेर तालुका शिवसेनेचा भक्कम बालेकिल्ला बनविण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते यांनी केले.

## निधन वार्ता

### यशवंत कानवडे



**संगमनेर खुर्द** : संगमनेर तालुक्यातील निमगाव पागा येथील प्रगतशील शेतकरी यशवंत भिमाजी कानवडे (वय ७६) यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी अनुसया कानवडे, दोन मुले अनिल कानवडे,विजय कानवडे, दोन मुली प्रमिला गडाख, रतन ढगे, यांचे ते वडील होत.तसेच सुना,नातवंडे,जावई. असा मोठा परिवार असून, त्यांच्या जाण्याने एक प्रगतशील शेतकरी, व रोज वर्तमानपत्र वाचणारे व्यक्तिमत्व हरपल्याची भावना जणमाणसात व्यक्त होत आहे.

### सुभाष दरंदले



**नेवासा** : येथील विवेकानंदनगर येथील रहिवासी व श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त लिपिक सुभाष पंढरीनाथ दरंदले यांचे हदयविकाराने निधन झाले मृत्यूसमयी त्यांचे वय ६९ वर्षे होते. सुभाष दरंदले यांच्या पच्यात पत्नी, तीन बहिणी, एक भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, जावई नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते संतोष दरंदले यांचे ते बंधू तर युवा कार्यकर्ते प्रथमेश उर्फ भैय्या दरंदले व कल्याणी आडसुरे यांचे ते वडील होते. मनमिळाऊ स्वभावाचे व धार्मिक वृत्तीचे असलेल्या सुभाष दरंदले यांच्या अकस्मात निधनाने हळहळ व्यक्त केली जात आहे.

### पुष्पा गायकवाड



**नेवासा** : येथील पुष्पा बापूसाहेब गायकवाड (वय ५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी,सून,नातवंडे असा परिवार आहे. नेवासा वीज वितरणचे तंत्रज्ञ निलेश गायकवाड यांच्या त्या मातोश्री

## कौटुंबिक वादातून मुलाचा वडिलांवर जीवघेणा हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील मानोरी येथे कौटुंबिक वादातून मुलाने वडिलांवर जीवघेणा हल्ला करून जबर मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी मुला विरूद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दि. १५ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मानोरी गावात मिरवणूक पार पडली. मिरवणूक संपवून बाबासाहेब मकासरे रात्री सुमारे १० वाजता घरी गेले. त्यांचा मुलगा राहुल मकासरे हा आईशी वाद घालत होता. शेती व बैल विकून चारचाकी वाहन खरेदीसाठी पैसे देण्याची मागणी करत त्याने शिवीगाळ व दमदाटी करत होता. वडिलांनी थोडा अवधी मागितल्यावरही आरोपी राहुल मकासरे याने संतापून धमक्या दिल्या. रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास त्याने लाकडी काठीने वडिलांना मारहाण केली. त्यानंतर लोखंडी दांडे असलेल्या खोर्याने पायावर वार करत गंभीर दुखापत केली. यात बाबासाहेब मकासरे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून ते खाली कोसळले. घटनेवेळी शेजारील विलास मकासरे, सचिन मकासरे, प्रशांत मकासरे तसेच पत्नी हिराबाई मकासरे यांनी धाव घेऊन त्यांना आरोपीच्या तावडीतून सोडवले. जखमी अवस्थेत त्यांना अहिल्यानगर येथे उपचारासाठी येथे दाखल करण्यात आले.

पैसे दिले नाहीतर पाय तोडीन तसेच तुमच्या मुलींनाही सोडणार नाही, अशी धमकी दिली. त्यामुळे स्वतःच्या जीवाला धोका असल्याचे बाबासाहेब मकासरे यांनी नमूद केले आहे. या प्रकरणी आरोपी राहुल बाबासाहेब मकासरे, रा. मानोरी, ता. राहुरी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वडिलांच्या हत्येचा आरोप सिद्ध करण्यात अपयश; मुलाची निर्दोष मुक्तता

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**वैजापूर** : वडिलांची निर्घृण हत्या केल्याच्या आरोपाखाली खटला भरलेल्या मुलाची सबळ पुराव्याअभावी गंगापूर न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.गंगापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.बी.बाहळकर यांनी १० मार्च रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

तालुक्यातील दहेगाव येथे ५ फेब्रुवारी २०२२ रोजी दहेगाव कडूबाळ मुरलीधर सोनवणे यांची त्यांच्या राहत्या घरी हत्या झाली होती.या प्रकरणी मयताचा मोठा मुलगा सुनील सोनवणे याने आपला लहाना भाऊ आणि आरोपी अनिल कडूबाळ सोनवणे याच्याविरुद्ध फिर्याद दिली होती.आरोपी अनिल हा वडिलांकडे लग्नाचा हट्ट धरून त्यांच्याशी नेहमी भांडण करत असे घटनेच्या दिवशी अनिलने वडिलांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांची हत्या केली,असा पोलिसांचा दावा होता.या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले.या घटनेचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हता.पोलिसांनी सादर केलेले परिस्थितीजन्य पुरावे साखळी पूर्ण करण्यात अपयशी ठरले. आरोपीच्या कपड्यांवर रक्ताचे डाग सापडल्याचा दावा पोलिसांनी केला होता,परंतु रासायनिक विश्लेषण प्रयोगशाळेचा अहवाल 'अनिश्चित' आला.त्यामुळे ते रक्त मयताचेच होते,हे सिद्ध झाले नाही.फिर्यादी सुनील सोनवणे याने न्यायालयात सांगितले की अनिलने गुन्ह्याची कबुली दिली होती,.न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले की,गुन्हा गंभीर असला तरी केवळ संशयाच्या आधारे कुणालाही दोषी ठरवता येत नाही.फिर्यादी पक्षाला आरोपीविरुद्धचा गुन्हा नि:संशयपणे सिद्ध करता आला नाही.त्यामुळे संशयाचा फायदा देऊन अनिल कडूबाळ सोनवणे याची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आणि त्याची या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड.अमिनुल्ला अहेमद मोसीनअली खान यांनी काम पाहिले.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE Y OLD NAME ASIF AMRUDDIN SHAIKH ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS AASIF KAMRUDDIN SHAIKH (AADHAR NO. 9744 3771 0940) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY UBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 23/04/2026

### बदलत्या वातावरणात जल व्यवस्थापनावर भर देण्याची गरज : शैलेश देशमुख

**बाभळेश्वर** : बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीसाठी पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरत असून पाण्याची बचत म्हणजेच पाण्याची निर्मिती हा मूलमंत्र अंगीकारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वरचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले.

कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे जलसंपदा विभाग व राहाता तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२६' अंतर्गत शेतकरी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देशमुख मार्गदर्शन करत होते. कार्यशाळेत पिक पद्धतीतील बदल, उत्पादकता वाढ, पाण्याचे नियोजन आणि जलसंवर्धन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांनी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर, पिकनिहाय पाणी व्यवस्थापन, मृद व जलसंधारण उपाययोजना यांचा अवलंब करावा, तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असा सल्ला देशमुख यांनी दिला. कमी पाण्यात अधिक उत्पादन मिळवण्यासाठी पिक पद्धतीत बदल करण्याचेही त्यांनी सुचविले. यावेळी तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी 'जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२६' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आगामी खरीप हंगामात पडणारा प्रत्येक पावसाचा थेंब जमिनीत मुरवण्यासाठी जलसंधारणाचे एकत्रित प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित 'गोदा ते नर्मदा जलजागृती यात्रा'मध्ये शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता रजनीकांत कवडे, शाखा अभियंते, तसेच कृषी व जलसंपदा विभागाचे अधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. प्रियंका खर्डे यांनी केले, तर आभार रजनीकांत कवडे यांनी मानले.

## नेवासा बाजार समितीत ६ मेपासून खुल्या कांदा खरेदी-विक्रीला प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**नेवासा** : नेवासा बाजार समितीमध्ये बुधवार, दि. ६ मेपासून सकाळी ९ वाजता खुल्या कांदा खरेदी-विक्रीला सुरुवात होणार असल्याची माहिती सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली. या उपक्रमामुळे तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन महंत उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर व महंत वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री शंकरराव गडाख राहणार आहेत. यापुढे नेवासा बाजार समितीत आठवड्यातील प्रत्येक मंगळवार व गुरुवार या दिवशी खुल्या कांदा लिलावाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

घोडेगाव येथील कांदा गोणी मार्केटला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर नेवासा येथेही हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या कांद्याची काढणी सुरू असताना अनेक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसल्याने ते जागेवरच माल विक्री करत आहेत. मात्र, शेतकऱ्यांनी खुल्या लिलावाचा लाभ घेण्यासाठी नेवासा बाजार समितीत कांदा आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नेवासा तालुक्यातील भालगाव, गोधेगाव, प्रवरासंगम, सलाबतपूर, जळके, वरखेड, रामडोह, गोगलगाव, गळनिंब, मुरमे, सुरेगाव गंगा, सुरेगाव दही, देडगाव, पाचेगाव, पुनतगाव, खुपटी, बेलपिंपळगाव, बेलपांढरी तसेच परिसरातील शेतकऱ्यांना या सुविधेचा लाभ होणार आहे.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना बाहेरगावी जाऊन कांदा विक्री करण्याची गरज भासणार नाही. वेळ व खर्चाची बचत होण्याबरोबरच विक्रीनंतर तत्काळ काटा-पट्टी पेमेंट मिळणार असल्याने आर्थिक व्यवहार अधिक सुलभ होतील. या निर्णयामुळे स्थानिक बाजारपेठेला चालना मिळून अर्थकारणाला बळकटी मिळेल, असा विश्वास सभापती पाटील यांनी व्यक्त केला.



## कायदा-सुव्यवस्थेत सुधारणा करा
### अन्यथा धरणे आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यात वाढत्या अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यात पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करत, काँग्रेस पक्षाच्या वतीने नेवासा पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. तालुक्यातील बिघडलेल्या कायदा-सुव्यवस्थेत तात्काळ सुधारणा करावी, अन्यथा पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, तालुक्यात अवैध धंद्यांचे प्रमाण वाढले असून वाळू उपसा, मटका, गुटखा विक्री, अवैध दारू, गांजा विक्री तसेच महामार्गांवरील चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. याशिवाय लॉजिंगवर सुरू असलेला वेश्याव्यवसायही चिंतेचा विषय ठरत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करण्याऐवजी दुर्लक्ष केल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला. काही पोलीस कर्मचाऱ्यांचे गुन्हेगारांशी आर्थिक हितसंबंध असल्याची चर्चा असून, त्यामुळे गुन्हेगारीला खतपाणी मिळत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. गंभीर गुन्ह्यांमध्येही केवळ एनसी दाखल करून आरोपींना अभय दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काँग्रेसने तातडीने कारवाई करून सर्व अवैध धंद्यांवर आळा घालावा व तालुक्यातील कायदा-सुव्यवस्था सुधारावी, अशी मागणी केली आहे. येत्या आठवडाभरात ठोस कारवाई न झाल्यास नेवासा पोलीस ठाण्यासमोर निदर्शने व धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, शहराध्यक्ष अंजुम पटेल, युवा नेते हरीश चक्रनारायण, महिला काँग्रेस अध्यक्षा शोभाताई पातारे, उपाध्यक्ष सतीश तऱ्हाळ यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जगाला बुद्धाच्या शांतीची गरज -भंते सारिपुत्त

**प्रतिनिधी । राष्ट्र स ह्याद्री**

**आश्वी** : जगाला बुद्धाच्या शांतीची गरज असुन बुध्द विचाराचे अनुसरण केल्याने ती प्रत्येकाला प्राप्त होते. दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या आश्वी खुर्द येथील ग्राम शाखेच्या वतीने आश्वी खुर्द येथे दहा दिवसांच्या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी पुजनिय भंते सारिपुत्त यांनी सांगितले. जिल्हाध्यक्ष शांताराम रणशुर यांनी धम्म ध्वजारोहण केले.समता सैनिक दलाच्या जिल्हा उपाध्यक्ष शकुंतला जाधव व उपस्थित शिस्तबद्ध सैनिकांनी सलामी देऊन ध्वजवंदन केले. दहा दिवसांच्या सविस्तर कार्यक्रमाचा आढावा समन्वयक आणि तालुका संस्कार सचिव अनिल मुन्तोडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सादर केला. यावेळी मंचावर वरिष्ठ केंद्रीय शिक्षक राजेंद्र पिंपळे, जिल्हा उपाध्यक्ष गौतम पगारे, तालुका प्रभारी विश्वास जमधडे, तालुका अध्यक्ष अशोक गायकवाड, सरचिटणीस राजू मुन्तोडे उपस्थित होते. यावेळी सारिपुत्त भंतेजी यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित शिबिरार्थी यांचा प्रवज्जा विधी संपन्न झाला.उपस्थितांनी श्रामणेर संघाला शुभेच्छा दिल्या.यावेळी माळेवाडी ग्राम शाखेचे कोषाध्यक्ष आकाश जगताप यांनी संघाला फलाहार अर्पण केला. यावेळी शिबलापुर,मालुंजे,डिग्रस,पिंप्री लौकी,खांबे,खळी शाखेचे शाखाध्यक्ष अनुक्रमे संदीप मुन्तोडे,सागर खरात, आशा खरात, मनिषा भालेराव, वंदना कदम, शोभा वाघमारे उपस्थित होत्या.यावेळी तालुका व जिल्हा पदाधिकारी यांना सर्व ग्राम शाखेने पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.




उपस्थित सर्व कार्यक्रमाची चोख व्यवस्था स्थानिक महिला ग्रामशाखा अध्यक्ष पुजा मुन्तोडे व सर्व पदाधिकारी यांनी केली.

अध्यक्षस्थानी ग्राम शाखा अध्यक्ष दत्तराज मुन्तोडे होते.सुत्रसंचलन सरचिटणीस राजेंद्र मुन्तोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्कार सचिव सुशिल मुन्तोडे यांनी केले.कार्यक्रमानंतर एकनाथ मुन्तोडे व कलाबाई मुन्तोडे यांनी भोजन दान केले.


## नशिबाची परिक्षा
**शुक्रवार दि .२४ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-१ | १२८ २९० २२७ | जोड ५७-४१-९० ३६-१८ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|---|
| १४६ ४७० ३४४ | ९-० | १९० २८० ५५० | जोड १३-८०-२४- ३७-०९ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १२४ ४६७ ७०० | ७-२ | १५४ १२४ ११० | जोड ७४-१२-३५ ९८-२३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवर मोलमजुरीची वेळ : वराट

## जामखेडमध्ये संपकरी कर्मचाऱ्यांच्या वतीने तहसील कार्यालयावर पेन्शन दिंडी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : शासनाच्या अन्यायकारक धोरणामुळे सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांवर मोलमजुरीची वेळ आली आहे. तिस वर्षे सेवा करून पेन्शन मिळत नाही यामुळे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. त्यामुळे शासनाने जुनी पेन्शन योजना लागू करावी अशी मागणी माध्यमिक शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष सुदाम वराट यांनी केली.

जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह इतर प्रलंबित मागण्यांसाठी आज बेमुदत संपाच्या तिसऱ्या दिवशी गुरूवारी संपकरी कर्मचाऱ्यांच्या वतीने जामखेड तहसील कार्यालयावर पेन्शन दिंडी काढण्यात आली होती.

यावेळी समन्वय समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र पाडळे,

ज्येष्ठ शिक्षक नेते शिवाजीराव ढाळे, माध्यमिक शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष सुदाम वराट, सचिव संतोष पवार, मोहन यादव, दत्तात्रय राजमाने, अनिल देडे, उपाध्यक्ष जाकिर शेख, सहसचिव भागवत चांगुणे, कैलास वराट, राघवेंद्र धनलगडे, अमोल भोंडवे, खजिनदार हनुमंत वराट, अर्जुन



रासकर, मयूर भोसले, बबन राठोड, रोहित घोडेस्वार, त्रिंबक लोळगे, अतुल दळवी, महसूलचे नंदुरबार गव्हाणे, रविंद्र शेटे, विकास मोराळे, तलाठी संघाचे तालुकाध्यक्ष सुजित गोडगे, रमेश कांबळे, दादा शेख, सर्फराज शेख, विलास आजबे,

आरोग्य विभागाचे मुबारक शेख, संपत घंटे, लहू जेधे, निलेश खाडे, चंद्रकांत वनवे, सागर गुंड यांच्या सह शिक्षण, महसूल, आरोग्य विभागातील अनेक कर्मचारी उपस्थित होते.

मंगळवार २१ एप्रिलपासून राज्यव्यापी संपाची हाक देण्यात आली आहे. या संपात राज्यातील तब्बल १७ लाख कर्मचारी सहभागी झाले आहेत. जामखेड तालुक्यातील शिक्षक, शिक्षकेत्तर, आरोग्य, महसूल यासह अनेक विभागातील कर्मचारी सहभागी झाले आहेत. यामुळे तीन दिवसांपासून शाळा, तहसील कार्यालय, कृषी, आरोग्य विभागाची कार्यालये ठप्प झाले आहेत. मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संप सुरूच राहणार असा निर्धार समन्वय समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

आज सकाळी दहा वाजता टाळ पखवाज घेऊन करो तहसील आवारात आले. शासनाला जाग आणण्यासाठी ज्ञानोबा तुकाराम च्या गजरात एक, दोन, तीन, चार पेन्शन चा जयजयकार, पेन्शन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, एकच मिशन जुनी पेन्शन, कर्मचारी एकजुटीचा विजय असो, हम सब एक है अशा घोषणा टाळ मृदंग च्या गजरात मागणी केली. यामुळे संपूर्ण तहसील परिसर भक्ती मय वातावरणात दुमदुमून गेला होता.

टाळ-मृदंगाच्या गजरात पेन्शन दिंडी काढणे हे आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्याचे एक प्रभावी आंदोलन आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या ओपीएस मागणीसाठी वारकरी पद्धतीचा वापर करून ही दिंडी काढली होती. आमची पेन्शन आम्हास द्या, जुनी पेन्शन लागू करा अशा आशयाची भजने आणि अभंग याद्वारे गायली. यामुळे तहसील कार्यालयात पेन्शन चाच आवाज घुमला.

# मोहोज देवढेत वीजप्रश्न पेटला

## चर्चेनंतर आंदोलनाला तात्पुरती ब्रेक

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : तालुक्यातील मोहोज देवढे येथे वीजपुरवठ्याच्या गंभीर समस्यांमुळे ग्रामस्थांच्या सहनशीलतेचा बांध फुटण्याच्या स्थितीत आला होता. कडाक्याच्या उन्हात वीजेचा अपुरा आणि कमी दाबाचा पुरवठा नागरिकांच्या जिवावर उठला असताना, गावात आंदोलनाची ठिणगी पडली आणि वातावरण चांगलेच तापले. मात्र ऐनवेळी पोलिस प्रशासनाने हस्तक्षेप करून चर्चा घडवून आणल्याने उद्रेक टळला आणि आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

या प्रसंगी पत्रकार राजेंद्र देवढे यांनी अत्यंत रोखठोक आणि ठाम शब्दांत आपली भूमिका मांडली. मी कुठल्याही आमिषाने किंवा दबावाने प्रशासनाच्या दारात जाणारा नाही. माझी पत्रकारिता ही संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर आधारलेली आहे. पण संघर्ष करताना नाठाळांसोबत सज्जनांचं नुकसान होऊ नये, याची जबाबदारीही आम्ही घेतो, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. त्यांच्या या विधानाने आंदोलनाला वेगळाच धारदार सूर मिळाला.

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे नागरिक आधीच हैराण झाले आहेत. त्यात सिंगल फ्यूज योजनेअंतर्गत मिळणाऱ्या वीजेचा अत्यंत कमी दाब ही मोठी समस्या ठरली आहे. घरातील पंखेही नीट फिरत नसल्याने नागरिक अक्षरशः त्रस्त झाले असून, रोजच्या जीवनावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. या प्रश्नावर तत्काळ उपाययोजना न झाल्यास राज्य सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याची अंत्ययात्रा काढून अंत्यसंस्कार करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला होता.

संभाव्य तणाव लक्षात घेता सहायक पोलिस निरीक्षक संदीप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यांनी महावितरणचे कक्ष अभियंता गणेश सांगळे यांना घटनास्थळी बोलावून ग्रामस्थांसमोर थेट संवाद साधला. प्रशासनाने समस्येवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनाला तात्पुरता विराम देण्यात आला.

दरम्यान, कार्यकारी अभियंता लक्ष्मण काकडे यांना निवेदन दिल्यानंतर महावितरणकडून सूडबुद्धीने कारवाई झाल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला होता. या मुद्द्यावर बोलताना देवढे यांनी व्यापक चित्र मांडले. राजकीय हस्तक्षेप आणि लोकानुनयी निर्णयांमुळे विद्युत व्यवस्थेची घडी विस्कटली आहे. आज महावितरण कंपनी आर्थिक अडचणीत आहे. त्यामुळे केवळ अधिकाऱ्यांवर आरोप करून प्रश्न सुटणार नाही. आपल्याला एकत्र येऊनच यावर उपाय शोधावा लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### अग्नीपंख फौंडेशन एक मुठ धान्य अनाथांसाठी

# उपक्रम दरवर्षी राबवावा : आनंद भंडारी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : स्व अजीत पवार यांचे नेतृत्व हे विकासाचा ध्यास आणि सामान्य माणसांच्या समस्यांची जाणीव असलेले होते त्यांना श्रध्दांजली म्हणून अग्नीपंख फौंडेशनने राबविलेला एक मुठ धान्य अनाथांसाठी हा उपक्रम कौतुकास्पद आहे. भविष्यात मुलांमध्ये दातृत्वाची भावना निर्माण करणे आणि वंचितांना आधार देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम शाळांमध्ये राबविणे आवश्यक आहे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी श्रीगोंदा येथे बोलताना केले.

अग्नीपंख फौंडेशनने गुरुवारी एक मुठ धान्य अनाथांसाठी या उपक्रमात भाग घेतलेल्या ७२ शाळांचा कृतज्ञता सोहळा आयोजीत केला यावेळी आनंद भंडारी बोलत होते. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब वाघ होते. यावेळी सर्व शाळांना उपयुक्त भेटवस्तू व दहा शाळांना सन्मानपत्र दहा सायकली भेट देण्यात आल्या. आनंद भंडारी पुढे



म्हणाले की शाळा विद्यार्थी खेळाडू भारतीय जवान यांना प्रोत्साहन देणे ही अग्नीपंखची थीम चांगली आहे. सोशल मिडीयाचा वापर कमी करण्यासाठी मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याची त्यासाठी प्रत्येक शाळेत वाचनालय तयार झाले पाहिजे प्राथमिक विभागाचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील म्हणाले की अग्नीपंखने शाळांना आधार सामाजिक परिवर्तन करण्याच्या दृष्टीने चांगले काम चालविले आहे माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड म्हणाल्या की शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्वराजाची शपथ घेतलेल्या रायरेश्वर गडावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची सुंदर इमारत बांधून दिली. अशा कामांची गरज आहे.

यावेळी उद्योजक संजयकुमार मचे प्रविण शिंदे, रामदास झेंडे डी डी भुजबळ विकास पाटील आबासाहेब जगताप यांची भाषणे झाली प्रास्ताविक अग्नीपंख फौंडेशनचे विश्वस्त दिलीपराव काटे यांनी केले. यावेळी तहसीलदार सचिन डोंगरे, गटविकास अधिकारी राणी फराटे, गटशिक्षणाधिकारी कुसुम कुमारी कानडी, संदीप सोमवंशी, किसन वऱ्हाडे, एन टी शेलार, अंकुश घाडगे, गोपाळराव डांगे, भावना मोहीते होते. सुत्रसंचलन विशाल चव्हाण यांनी केले आभार राजकुमार इथापे यांनी मानले.

# दिव्यांगांच्या हक्कांसाठी प्रहार संघटनेचा एल्गार



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : दिव्यांगांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने श्रीगोंदा तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. दरमहा मिळणारी पेन्शन अनियमितपणे मिळत असल्याने दिव्यांग बांधव अडचणीत सापडले असून, याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

संघटनेच्या निवेदनानुसार, अनेक दिव्यांगांना मागील काही महिन्यांपासून पेन्शन मिळालेली नाही. तसेच, अंत्योदय योजना अंतर्गत अर्ज करूनही लाभ मिळण्यात विलंब होत आहे. त्यामुळे दिव्यांगांच्या दैनंदिन जगण्यावर परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.याशिवाय तहसील कार्यालयात दिव्यांगांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. कार्यालयात व्हीलचेअरची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच स्वतंत्र शौचालयाची सोय करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

दिव्यांगांना हक्कासाठी दरवेळी दार ठोठावावे लागत असेल, तर व्यवस्था कुठे तरी कमी पडतेय, असा थेट सवाल उपस्थित करत संघटनेने प्रशासनाला जागे होण्याचा इशारा दिला आहे. मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, श्रीगोंदा तालुक्याचे अध्यक्ष सुधीर भालेराव, कार्याध्यक्ष अब्दुल सय्यद, उपाध्यक्ष किसन बाराते, संतोष हराळ, सचिव सुरेश गलांडे यांच्यासह बापू रंधवे, रोहिदास वडवकर, रावसाहेब चव्हाण, सचिन तोडकर, अभिजीत चौधरी, विशाल काळे, राजू आमले आदींसह मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव-भगिनी उपस्थित होते.

# श्रीगोंद्यात कचरा संकलनाचा बोजवारा

## नागरिक त्रस्त, नगरसेवकांचा इशारा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरातील कचरा संकलन व्यवस्थेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. ओला व सुका कचरा संकलनासाठी दररोज फिरणे अपेक्षित असलेली घंटागाडी अनेक भागांत ४ ते ५ दिवस, तर काही ठिकाणी तब्बल ८ ते १० दिवसांपर्यंत फिरकत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.याबाबत नगरसेवक सुशील शिंदे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

श्रीगोंदा शहरातील श्रीगोंदा नगर परिषदेच्या माध्यमातून कचरा संकलन करून त्याची विल्हेवाट लावण्याची गरज आहे मात्र श्रीगोंद्यात प्रभाग क्रमांक २ सहित शहरातील विविध भागांमध्ये कचरा साचून दुर्गंधी पसरत असून स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. परिस्थिती इतकी बिघडली आहे की, पर्याय नसल्यामुळे काही नागरिक रस्त्यांवर व मोकळ्या जागांवर कचरा टाकण्यास मजबूर झाले आहेत. त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढून आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे.यासंदर्भात नागरिकांनी संबंधित कर्मचाऱ्यांशी संपर्क साधूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार आहे. तसेच नगरपरिषद प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याने संताप अधिक वाढला आहे.दरम्यान, प्रभाग क्रमांक २ चे नगरसेवक ड. सुशीलकुमार शिंदे यांनी या प्रकरणी नगरपरिषदेकडे लेखी निवेदन देत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. घंटागाडी सेवा नियमित करण्यासोबतच, तोपर्यंत पर्यायी उपाय म्हणून स्वतःच्या वाहनाद्वारे कचरा संकलन करण्यास परवानगी देण्याची मागणी त्यांनी केली आहे.तसेच, प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वतः पुढाकार घेऊन कचरा संकलन सुरू करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. यामुळे नगरपरिषद प्रशासनावर आता तातडीने निर्णय घेण्याचा दबाव निर्माण झाला आहे.आता कचरा उचलला नाही, तर प्रश्न उचलला जाईल अशी भूमिका नागरिकांमध्ये दिसून येत असून, प्रशासनाने आता झोपेतून जागे होण्याची गरज व्यक्त होत आहे.

दरम्यान, कचरा संकलन होत नसल्यामुळे परिसरात दुर्घधी पसरली असून परिसरात आरोग्याचा गंभीर प्रश्न उभा राहण्याची शक्यता नाकारता येत नाही राजकारण बाजूला राहील मात्र लोकांचा जावं जाईल याबाबत नगरसेवक सुशीलकुमार शिंदे यांनी फेसबुक लाईव्ह करत निवेदन देत संताप व्यक्त केला आहे .

### कोट्यवधी खर्चूनही पाणी नाही

# मनपाचा छुप्या पद्धतीने पाणीपट्टी दरवाढीचा डाव : काळे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : वाढीव पाणी पट्टी दरांमुळे सर्वसामान्यांवर आर्थिक ताण वाढत आहे. सेवा शून्य, मात्र दरवाढ पूर्ण आहे. वेगवेगळ्या पाणी योजनांवर आजवर कोट्यवधी खर्चूनही ३६५ दिवस, मुबलक आणि स्वच्छ पाणी नाही. त्यामुळे पाणी पट्टी वाढीचा नैतिक अधिकार मनपाला नाही. प्रति वर्ष दोनशे रुपयांची वाढ करून मनपाचा छुप्या पद्धतीने पाणीपट्टीच्या वारेमाप दरवाढीचा डाव सुरू असल्याचा आरोप, ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

शहरातील पाणीपट्टी दरवाढ तात्काळ स्थगित करावी, अशी मागणी नागरिकांच्या वतीने महानगरपालिका प्रशासनाकडे विरोधी पक्षांनी केली आहे. यासंदर्भात आयुक्त



यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी काळे बोलत होते. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, रावजी नांगरे, पै. दीपक भोसले, राम वाणी, राम झिने, चंद्रकांत उजागरे, संजय कांबळे, राम धोत्रे, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना रणशूर, विकास भिंगारदिवे, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, विनोद शिरसाट, माजी नगरसेवक फैयाज शेख, हाफिज सय्यद, धनंजय देशमुख, गणेश आपरे, आकाश आल्हाट आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, आजवर फेज १, फेज २ आणि अमृत योजने अंतर्गत तीनशे कोटींपेक्षा अधिक खर्च झाला. मात्र, तरीही अनेक भागांमध्ये नियमित व पुरेसा पुरवठा होत नाही. घरगुती वापरासाठी ९०० ते ४००० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली असून, दरवर्षी २०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. पुढील पाच वर्षांत छुप्या पद्धतीने सुमारे १७०० रुपयांची अतिरिक्त वाढ होणार आहे. ही वाढ सर्वसामान्यांना परवडणारी नाही. त्यामुळे पाणीपट्टी दरवाढ लागू करू नये. तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेत तात्काळ सुधारणा करून नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

- **प्रशासनाकडून करदात्यांची दिशाभूल :**
  पाणीपट्टीत कपात करण्याची घोषणा करण्यात आली असली तरी मूळ दरवाढीचा या पूर्वीचा ठराव कायम ठेवण्यात आला आहे. प्रशासनाकडून करदात्यांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप, किरण काळे यांनी केला आहे.
- **स्मार्ट सिटी म्हणता, पण शहर टँकर मुक्त कधी करणार?**
  महापालिका स्थापन होऊन दोन दशकांहून अधिक काळ झाला. तरी आजही काही भागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. त्यासाठी दरवर्षी कोट्यावधींचा खर्च केला गेला आहे. याही वर्षी सुमारे अडीच कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यावरून पाणी वितरण व्यवस्थेत किती गंभीर त्रुटी आहेत हे लक्षात घेतल पाहिजे. लोकप्रतिनिधी, प्रशासन शहराची वाटचाल स्मार्ट सिटीकडे सुरू असल्याचे कायम दावे करतात. पण त्याआधी शहर टँकर मुक्त कधी करणार?, असा सवाल किरण काळे यांनी केला आहे.

## द • ख • ल

### नगरपालिका प्रशासकाच्या जाचाला व्यापारी वैतागले लोकप्रतिनिधींनी वेळीच लक्ष घालण्याची गरज

**शेवगाव** : शेवगाव शहरातील नगरपालिका प्रशासनाला व्यापारी वर्ग वैतागला असून लोकप्रतिनिधींनी वेळीच लक्ष दिले नाही तर शेवगाव बाजारपेठ उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही असा सूर व्यापारी वर्गातून सध्या निघत आहे. शेवगाव शहरातील व्यापारी लॉकडाऊन, शेअर बाजार, रस्त्यावरील अतिक्रमण यातून आधीच घायकुतीला आलेला आहे. तसेच बाजारपेठेत म्हणाव तसा ग्राहकांचा प्रतिसाद नसल्याने आधीच कर्जबाजारी बनलेला आहे. शेवगाव नगरपालिकेच्या प्रशासक शहरातील व्यापारी वर्गाला अतिक्रमणाचा धाक दाखवून व्यापारी वर्गाला धारेवर धरण्याचे काम सध्या प्रशासकाकडून केले जात आहे. प्रशासकावर कुणाचाच अंमल नसल्याने व्यापारी वर्ग चिंता व्यक्त करीत आहे. शेवगाव शहराला महिन्यातून १८ दिवसाला होणारा पाणीपुरवठा याकडे मात्र प्रशासकाचे लक्ष नाही. नागरिकांचे पाण्यासाठी होणारे हाल प्रशासकाला दिसत नाहीत. व्यापारी वर्गासाठी गाळ्यांची सोय सुविधा उपलब्ध करणे गरजेचे होते.मात्र आजपर्यंत ही नगरपालिकेच्या जाग्यावर कोणत्याही गाळ्याची निर्मिती होताना दिसत नाही. त्याचा फटका प्रामुख्याने छोट्या व्यापाऱ्यांना सध्या बसलेला दिसून येत आहे. प्रशासकाची मनमानी बाजारपेठ उद्धवस्त करण्यासाठी पूरक असल्याचा आरोप सध्या व्यापारी वर्गातून केला जात आहे प्रशासकावर निर्बंध आणावेत अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

### संभागस्तरीय स्पर्धेत अहिल्यानगर शटिंग क्लबचा दबदबा

**अहिल्यानगर** : केन्द्रीय विद्यालय संगठन, मुंबई संभाग रिजनलच्या वतीने आयोजित संभागस्तरीय खेलकूद स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धामध्ये राज्यस्तरीय इंटर स्कूल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगर शूटिंग क्लबच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. उत्कृष्ट नेमबाजीचे प्रदर्शन करत खेळाडूंनी विविध पदके पटकावून जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे. या स्पर्धेत तेजस किरगत आणि महावीर पोटे यांनी सुवर्ण पदकांची कमाई करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. अनन्या शिंदे आणि अथर्व ठुबे यांनी रौप्य पदक पटकावले, तर रेवा शिंदे हिने कास्य पदक जिंकले. याशिवाय आदेश खराडे याने सहावा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. विशेष म्हणजे, अनन्या शिंदे आणि तेजसकुमार किरगत या दोन्ही खेळाडूंनी बेंचमार्क स्कोरपेक्षा अधिक गुण मिळवत राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे.

या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सचिव सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न घेतले. या उल्लेखनीय यशाबद्दल खेळाडूंवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह विविध मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### केमिस्ट भवनला पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुरुडगाव रोड येथे उभारण्यात आलेल्या नूतन केमिस्ट भवनाला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी भवनाच्या उभारणीबद्दल समाधान व्यक्त करत केमिस्ट बांधवांचे कौतुक केले.यावेळी जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांनी पालकमंत्र्यांचे स्वागत करत भवनाच्या उभारणीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या भवनामुळे संघटनेच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून, केमिस्ट बांधवांमधील समन्वय आणि एकजूट अधिक दृढ होणार आहे. विविध सामाजिक व व्यावसायिक उपक्रमांना चालना मिळणार असून, केमिस्ट बांधवांच्या प्रगतीसाठी हे भवन महत्त्वाचे केंद्र ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक निखील वारे, पै. महेश लोंढे, शहर उपाध्यक्ष भरत सुपेकर, शहर सचिव मनिष सोमाणी यांच्यासह संकेत गुरव, युवराज गुंजाळ, अमोल घोरपडे आदींसह केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नागापूर जिल्हा परिषद शाळेचे चाँद शेख यांना पुरस्कार जाहीर

**अहिल्यानगर** : शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना यंदाचा 'छत्रपती संभाजी महाराज गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी दिली. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे रविवार, दि. १७ मे रोजी हे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

दखल

# स्वाधार योजनेतील अर्ज त्रुटी दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत

**पुणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांमध्ये आढळलेल्या त्रुटी दुरुस्त करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत अंतिम संधी देण्यात आली आहे. सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडून त्रुटी असलेले अर्ज 'शिपीं लरलज्ञ' करून विद्यार्थ्यांना आवश्यक सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. मात्र, दिलेल्या अंतिम मुदतीपर्यंत अर्जातील त्रुटींची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज कायमस्वरूपी नाकारले जाणार असून, त्याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही समाज कल्याण विभागामार्फत केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ३० एप्रिल २०२६ पूर्वी आपल्या अर्जातील त्रुटी तात्काळ दुरुस्त करून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण अधिकारी, माधुरी वाघमोडे यांनी केले आहे.

# बाल संगोपन योजनेचा ८ हजाराहून लाभार्थ्यांना लाभ

**पुणे :** क्रांतीज्योती बाल संगोपन योजनेअंतर्गत माहे एप्रिल २०२५ अखेर जिल्ह्यातील एकूण ८ हजार ११४ इतक्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास अधिकारी रोहिणी ढवळे यांनी दिली आहे. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग ३० मे २०२३ अन्वये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ सुधारित अधिनियम २०२१ कलम २ (१४) व महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ नुसार अनाथ निराश्रीत निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्यांची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुला-मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदर योजना ही वैयक्तीक लाभाची योजना असून या योजनेअंतर्गत ० ते १८ वयोगटातील मुला-मुलींना शिक्षणासाठी दरमहा २२५० रुपये थेट लाभ देण्यात येतो. अनाथ, निराधार, निराश्रीत बालके, बेघर, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्याची मुले या योजनेचा लाभ घेतात. क्रांतीज्योती बालसंगोपन योजनेचा लाभ घेण्यासाठी नजिकच्या अंगणवाडी सेविका, पंचायत समिती , तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन श्रीमती ढवळे यांनी केले आहे.

# मलठणच्या पूजा गोसावी यांची पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती



**कवठे येमाई :** - शिरूर तालुक्यातील मलठण येथील सौ.पूजा महेश गोसावी यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर मोठे यश संपादन करत पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती मिळवली आहे.अत्यंत गरीब कुटुंबातून आलेल्या पूजा गोसावी यांनी अनेक अडचणींवर मात करत आपले ध्येय गाठले आहे. शिक्षण आणि करिअरच्या वाटचालीत त्यांना सासरे विलास गोसावी (युवा क्रांती पोलीस मित्र संघटना, शिरूर) यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांनी रूढी-परंपरांना बाजूला ठेवत सुनबाई पूजाला शिरूर येथील शितोळे करिअर अकॅडमीत प्रवेश मिळवून दिला. तसेच मार्गदर्शक शिक्षक शितोळे सर यांनी शारीरिक व लेखी परीक्षेची योग्य तयारी करून घेतली.या मार्गदर्शनासह स्वतः च्या मेहनतीच्या जोरावर पूजाने सर्व टप्पे यशस्वीरीत्या पार करत सुरुवातीला कारागृह पोलीस म्हणून काम केले आणि त्यानंतर आता पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती मिळवली आहे. तिच्या या यशामुळे मलठण गावासह परिसरात आनंदाचे वातावरण असून, अनेक मुलींना प्रेरणा मिळत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पूजा गोसावी आदर्श ठरत आहेत. गरीबी ही अडथळा नसून जिद्दीच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते, हे पूजाने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे, अशी भावना तिचे सासरे विलास गोसावी,पती महेश गोसावी यांनी व्यक्त केली आहे.

# पारगाव पोलिसांची तत्परता, हरवलेले मंगळसूत्र, रोख रक्कम दोन दिवसांत मिळाली

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील काठापूर बुद्रुक येथे मेंढपाळ महिलेकडील मौल्यवान ऐवज हरविल्यानंतर पारगाव कारखाना पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत तपास पूर्ण करत पिशवी शोधून काढत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या घटनेमुळे पोलिसांचे परिसरात कौतुक होत आहे. संगीता अंजबापू तिखोळे (वय ४०, रा. काठापूर बुद्रुक, ता. आंबेगाव; मूळ रा. पळशी वनकुटे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) या मेंढपाळ महिला रविवारी (दि. १९) घोडनदीच्या काठावर बकऱ्या चारत होत्या. यावेळी त्यांच्या कंबरेला खोचलेली कापडी पिशवी हरवली. त्या पिशवीमध्ये दोन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि रोख ३८ हजार रुपये असा मौल्यवान ऐवज होता. घटनेनंतर तिखोळे यांनी तात्काळ पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. संबंधित महिला आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंगेश अभंग यांनी तातडीने शोध मोहीम सुरू केली. तपासादरम्यान संशयित व्यक्तींना चौकशीसाठी बोलवून पोलिसी खाक्या दाखवण्यात आला. पोलिसांचा दबाव वाढताच संबंधित संशयिताने बुधवारी (दि. २२) हरवलेल्या ठिकाणीच पिशवी परत ठेवली. पोलिसांनी त्वरित घटनास्थळी जाऊन पिशवी ताब्यात घेतली व ती संगीता तिखोळे यांच्या स्वाधीन केली. या पिशवीत सोन्याचे मंगळसूत्र व रोख रक्कम मिळून अंदाजे सव्वातीन लाख रुपयांचा ऐवज सुरक्षित मिळाल्याने संबंधित महिलेने समाधान व्यक्त केले.



# खरीप हंगामासाठी खत-बियाणे उपलब्धतेवर जिल्हास्तरीय आढावा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** खरीप हंगाम २०२६ मध्ये शेतकऱ्यांना रासायनिक खते व बियाण्यांचा सुरळीत आणि पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय संरक्षित साठा सनियंत्रण समिती तसेच जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समितीची आढावा बैठक दि. २२ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत पुणे जिल्ह्यातील खत उत्पादक कंपन्या, बियाणे उत्पादक, वितरक, वाहतूकदार, नोडल एजन्सी आणि संबंधित कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशासनाने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. बैठकीस जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. संजय काचोळे, कृषी विकास अधिकारी श्री. अजित पिसाळ, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक श्री. धनंजय पाटील तसेच महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, सहकारी विकास महामंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. काचोळे यांनी सांगितले की, खरीप हंगामात खत व बियाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी सर्व कंपन्यांनी कृषी आयुक्तालयाकडून प्राप्त आवंटनानुसार वेळेत पुरवठा करणे आवश्यक आहे. मंजूर साठ्यापैकी जास्तीत जास्त खत पुरवठा एप्रिल, मे आणि जून महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्तेमार्गे खत पोहोचविण्यावर भर देण्यात आला. दौंड, बारामती आणि सासवड रोड येथील रेल्वे स्थानकांवर खत वाहतुकीस सिमेंट व इतर मालवाहतुकीपेक्षा प्राधान्य देण्याबाबत रेल्वे प्रशासनाशी समन्वय ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

युरिया व डीएपी खताची रेक जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी तालुकानिहाय पुरवठा नियोजन संबंधित कृषी विकास अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. वाहतूकदारांच्या करारातील विलंबामुळे खतपुरवठा विस्कळीत होऊ नये, यासाठी सर्व कंपन्यांनी वाहतूक करार वेळेत नूतनीकरण करावेत, अन्यथा संबंधित कंपनीस जबाबदार धरण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला. जिल्ह्यातील सर्व भागांमध्ये खताचे संतुलित वितरण व्हावे आणि कोणत्याही तालुक्यात कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी कंपन्यांनी दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या. रासायनिक खतांसोबत अनावश्यक किंवा मागणी नसलेल्या उत्पादनांची सक्ती विक्रेत्यांवर करू नये, असे स्पष्ट करण्यात आले. अशा तक्रारी आढळल्यास संबंधित कंपनी किंवा वितरकावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. संरक्षित खत साठ्याबाबत जिल्ह्यासाठी नियुक्त नोडल एजन्सींनी एप्रिल अखेर किमान ६० टक्के आणि मे अखेर १०० टक्के बफर स्टॉक उभारण्याचे निर्देश देण्यात आले. बफर स्टॉक करणाऱ्या एजन्सींनी तालुका कृषी अधिकारी आणि गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांशी सातत्याने संपर्क ठेवून कोणत्याही तालुक्यात खताची कमतरता भासणार नाही याचे नियोजन करण्यास सांगण्यात आले.

बियाणे पुरवठ्याबाबत कृषी विकास अधिकाऱ्यांनी बियाणे कंपन्या आणि वितरकांची स्वतंत्र बैठक घेऊन पेरणी क्षेत्रानुसार आवश्यक बियाणे उपलब्ध राहील याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. विशेषतः इंद्रायणी भात व उडीद बियाण्याचा पुरेसा साठा ठेवण्यावर भर देण्यात आला. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यास बाजरी, सोयाबीन आणि भात या पिकांचे अतिरिक्त बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी कंपन्यांनी तयारी ठेवावी, असेही स्पष्ट करण्यात आले. खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी खत व बियाणे पुरवठा साखळीतील सर्व घटकांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने यावेळी केले.

# सर्व कृषी विद्यापीठात ५० ॲग्री-बेस्ड इनक्यूबेशन सेंटर्स : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील सर्व कृषि विद्यापीठात कृषी उत्पादन विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी पहिल्या टप्प्यात ५० ॲग्री-बेस्ड इनक्यूबेशन सेंटर्स सुरू करा. कृषी विद्यापीठात तयार होणाऱ्या कृषी उत्पादनांची विक्री व्हावी, शेतकऱ्यांना प्रशिक्षण मिळावे व कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना कृषी उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी हा उपक्रम राबवावा असे निर्देश राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी दिले.

राज्यपाल वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन, मुंबई येथे कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग व कृषी विद्यापीठांच्या उपक्रमांवर उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीस पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन.रामस्वामी, राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील, आणि राज्यातील प्रमुख कृषी विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. राज्यपाल वर्मा म्हणाले की, शेतकऱ्यांना पोस्ट-हार्वेस्ट मॅनेजमेंटबाबत योग्य मार्गदर्शन व सुविधा, शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतकरी उत्पादक कंपनीना याबाबत मार्गदर्शन करून त्यांना सक्षम करण्यावर भर दिला पाहिजे. कृषी विद्यापीठांनी शैक्षणिक व प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ करून राष्ट्रीय स्तरावरील यूजीसी क्रमवारीत प्रगती साधावी. संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता व संस्थात्मक प्रशासन सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. यशस्वी शेतकऱ्यांच्या यशोगाथा सर्वांपर्यंत पोहोचवा. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रभावीपणे काम करावे असे निर्देशही त्यांनी दिले. राज्यपाल वर्मा म्हणाले की, नंदूरबार येथे आदिवासी महाविद्यालयात कृषि विभागाच्या वतीने कौशल्य प्रशिक्षण राबविण्यात यावे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय क्षेत्रात शाश्वतता, नवोन्मेष आणि शेतकरी-केंद्रित उपाययोजना राबविण्यासाठी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि शासनाचे विविध विभाग यांच्यात समन्वय वाढवावा. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी समन्वयातून सर्वांनी काम करावे. शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचे स्रोत निर्माण होऊन त्यांचा उदरनिर्वाह अधिक सक्षम होईल असे उपक्रम राबविण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

लोकभवनचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे यांनी प्रास्ताविक केले. पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागावे सचिव एन.रामस्वामी यांनी विभागाचे सादरीकरण केले. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या अनुषंगाने कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. विविध नाविन्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्यात येत आहे. मत्स्यव्यवसायिकांना शासकीय योजनांची माहिती होण्यासाठी विविध योजना पुस्तिका तयार करण्यात आलेल्या आहेत त्याचबरोबर या योजनांची प्रसिध्दी होण्यासाठी मोबाईल ग्रुप, चॅट बॉट, सुरू आहेत. या क्षेत्रात रोजगार वाढीसाठी योजनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. विकसित २०४७ च्या मिशन डाक्युमेंटप्रमाणे विभागाचे कामकाज सुरु आहे असे त्यांनी सांगितले.

कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी कृषी विभागाचे सादरीकरण केले. महाविस्तार ॲप ४० लाख लोकांनी डॉउनलोड केले आहे. महाॲग्री एआय धोरण, ॲग्रीस्टॅकमध्ये देशात व्दितीय क्रमांकावर आहोत. १.३२ कोटी लोकांनी ॲग्रीस्टॅक काढलेले आहेत. आदिवासी विकास विभागासाठी योजना, नैसर्गिक शेती शाळा, मॅग्नेट हा प्रोजेक्ट,एल निनोचा यावर्षी शेतीवर होणारा परिणाम, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रकिया योजना, कृषी विभागातील आकृतीबंद आणि त्यात केलेले बदल, आगामी तीस वर्षात कृषी क्षेत्राचा चेहरामोहरा बदलण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, शाश्वत विकास होणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना याची माहिती दिली.

यावेळी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील यांनी महाराष्ट्र पशू आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे सादरीकरण केले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली विद्यापीठाचे कुलगरु डॉ संजय भावे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी विद्यापीठाचे कुलगरु डॉ विलास खर्चे, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला विद्यापीठाचे कुलगरु डॉ. शरद गडाख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी विद्यापीठाचे कुलगरु डॉ. इंद्रमणी यांनी विद्यापीठांची सविस्तर माहिती व विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती राज्यपालांना सादर केली.

# आळंदीतील श्री ज्ञानेश्वर विद्यालयाचा तालुक्यात मानाचा तुरा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** खेड तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, आळंदी देवाची या प्रशालेला सन २०२५ - २६ मधील तालुकास्तरीय गुणवत्ता संवर्धन अभियानात प्रथम क्रमांक मिळाला आहे. या यशामुळे परिसरात संस्थेचे कौतुक होत आहे. पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या अभियानात इयत्ता पाचवी ते बारावी गट 'अ' मध्ये खेड तालुक्यातील सर्व शाळांची तपासणी करून ही निवड करण्यात आली.

पुरस्कार वितरण सोहळा गुरुवारी (दि.२३) गणेश कला क्रीडा मंच येथे उत्साहात पार पडला. यावेळी महेश पालकर, डॉ. गणपत मोरे, डॉ.भाऊसाहेब कारेकर यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

संस्कारक्षम, उपक्रमशील आणि दर्जेदार शिक्षणाबरोबरच धार्मिक व अध्यात्मिक मूल्यांची जोड देत कला व क्रीडा क्षेत्रातही आघाडीवर असलेल्या या शाळेच्या यशात विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक, प्रशासन आणि संस्था पदाधिकाऱ्यांचे संयुक्त योगदान असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वीकृत संस्थेचे सचिव अजित वडगावकर, प्राचार्य किसन राठोड, पर्यवेक्षिका अनिता गावडे तसेच संजय उदमले, विकास शिवले, अल्लाबक्ष मुलानी, गोविंद निळे यांनी केले.




# ओढ्याचे पाण्यात पडून १० वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू; अवसरी बुद्रुक परिसरात शोककळा



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक येथील चवरेमळा परिसरात घडलेल्या दुर्दैवी घटनेत १० वर्षीय मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. कृष्णा प्रशांत चवरे असे मृत मुलाचे नाव असून तो अवघ्या चौथीत शिक्षण घेत होता.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारच्या सुमारास कृष्णा हा आपल्या घराजवळून वाहणाऱ्या ओढ्या जवळ खेळत होता. खेळता खेळता त्याचा तोल जाऊन तो पाण्यात पडला. ओढ्यातील पाण्यातून तो बाहेर येऊ शकला नाही आणि त्यातच त्याचा बुडून मृत्यू झाला. दरम्यान, परिसरात आरडाओरडा सुरू झाल्याची माहिती नातेवाईकांना मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने कृष्णाला पाण्यातून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले. पुढील उपचारासाठी त्याला मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या प्रकरणी मंचर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. कृष्णाच्या अकाली निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कृष्णा हा गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीत शिकत होता. अभ्यासात हुशार आणि मनमिळावू स्वभावामुळे तो शिक्षक आणि मित्रांमध्ये लाडका होता. त्याच्या निधनाची बातमी समजताच गुरुवारी शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांनी शोकसभा घेऊन त्याला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. या हृदयद्रावक घटनेमुळे अवसरी बुद्रुक व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभाग सज्ज

## पशुधनाच्या सुरक्षिततेसाठी नियोजन व अंमबजावणीचे मार्गदर्शक तत्वे जारी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यात वाढत्या तापमानाची शक्यता व उष्णलहरींचा धोका लक्षात घेता, पशुसंवर्धन विभागाने राज्यातील पशुपालक, कुक्कुटपालक व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. वाढत्या उष्णतेमुळे पशुधनावर होणारे विपरीत परिणाम टाळण्यासाठी विभागाने सर्व पशुवैद्यकीय संस्थांना सतर्क राहण्याचे आदेश दिले असून, पशुपालकांनी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.

उष्णलहरींच्या काळात पशुधनाची कशी काळजी घ्यावी व याबाबत क्षेत्रिय स्तरावर काय जनजागृती करण्यात यावी, याबाबत पशुसंवर्धन विभागाने मार्गदर्शक सूचनांच्या माध्यमातून अधिनस्त संस्थाप्रमुखांना अवगत केले आहे. तसेच पशुपालकांना मार्गदर्शक सूचनांच्या माध्यमातून पशुधनाची काळजी घेण्याबाबत आवाहन केले आहे. यामध्ये, पशुधनाला पुरेसे स्वच्छ आणि थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. आहारात क्षार मिश्रणे व जीवनसत्वांचा समावेश करावा. दुभत्या जनावरांना संतुलित आहार द्यावा.

शेतीच्या किंवा वहनाच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या पशुधनाला सकाळी ११ ते सायंकाळी ४ या तीव्र उन्हाच्या काळात विश्रांती द्यावी. त्यांना सावलीत किंवा खेळती हवा असलेल्या थंड जागी बांधावे. गोठ्याचे छत उष्णता रोधक असावे किंवा छतावर गवत/पालापाचोळा टाकून त्यावर पाणी मारावे. शक्य असल्यास स्प्रिंकलरचा वापर करावा. खिडक्यांना सावलीची व्यवस्था असावी. उष्णलहरी सुरू होण्यापूर्वी घटसर्प, फऱ्या व आंत्रविषार यांसारख्या रोगांचे प्रतिबंधक लसीकरण व जंतनाशक औषधे पाजणे आवश्यक आहे.

तातडीच्या उपाययोजना व उपचार: पशुधनामध्ये उष्माघाताची लक्षणे (उदा. धापा टाकणे, तोंडावाटे लाळ गळणे, अस्वस्थता) दिसून आल्यास त्वरित तात्काळ सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे. पशुधनावर थंड पाण्याचा मारा करावा. (अश्ववर्गीय प्राण्यांच्या बाबतीत पायाकडून शरीराच्या वरील भागाकडे पाणी मारावे). जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. पशुसंवर्धन विभागाने सर्व क्षेत्रीय संस्थांना हवामान विभागाच्या संपर्कात राहून दैनंदिन तापमानाचा अंदाज घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. सर्व दवाखान्यांमध्ये आवश्यक जीवरक्षक औषधे, व औषधी साठा आवश्यक प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात आला आहे. फिरती पशुवैद्यकीय पथके तातडीच्या सेवेसाठी तैनात ठेवण्यात आली आहेत.

पशुसंवर्धन विभागाने जिल्हा प्रशासन, अशासकीय संस्था, तसेच सामाजिक-सेवाभावी संस्थांना आवाहन केले आहे की, रस्त्यावरील पशू-पक्ष्यांसाठी घराबाहेर किंवा सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची भांडी,हौद ठेवावेत. मृत पशुधनाची विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने लावण्यासाठी स्थानिक प्रशासनाने योग्य जागा आरक्षित ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. उष्णलहरींच्या काळात काय करू नये : पशुधन उन्हाळ्यात उघड्यावर बांधू नये. पाळीव पशुधनास पार्क केलेल्या गाडीत सोडून जावू नये. शेती विषयक व इतर कामासाठी वापरण्यात येणा-या पशुधनास उन्हाच्या वेळी कामास लावू नये. पशुधनास पिण्याच्या पाण्यासाठी उन्हात फार दूर व फार वेळ चालावे लागू नये याची दक्षता घ्यावी. पशुधनाची गर्दी करू नये. दाटीवाटीने बांधु नये. भर उन्हात पशुधनाची हलचाल / वाहतुक करू नये. उन्हे असल्यास दुभत्या पशुधनाचे दोहन करून नये. मृत पशुधन उघड्यावर टाकू नये.

> **''एल निनोच्या संकटकाळात पशुपालकांनी पशुसंवर्धन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. चारा व्यवस्थापन व पशुधनाच्या आरोग्याबाबत कोणत्याही मदतीसाठी स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. तसेच '१९६२ कॉल सेंटर'च्या माध्यमातून पशुसंवर्धनविषयक सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.**
>
> **डॉ. किरण पाटील,**
> **आयुक्त पशुसंवर्धन विभाग**

# आंबेगाव तालुक्यात उन्हाळी बाजरी फुलोऱ्यात



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, लाखणगाव, देवगाव, खडकवाडी, पारगाव, शिंगवे आदी गावांमध्ये उन्हाळी बाजरीचे पीक फुलोऱ्यात आले आहे. बाजरीचे पीक चांगले उत्पन्न देणारे असल्याने या परिसरातील शेतकरी दरवर्षी उन्हाळ्यात बाजरीचे पीक घेत आहेत. या वर्षी पाऊस चांगला पडल्याने डिंभे धरणात मुबलक पाणी उपलब्ध आहे. डिंभे धरणातून उजवा व डावा कालवा तसेच गोड नदीला शाश्वत पाणी उपलब्ध होत असल्याने कालव्या आणि नदीच्या किनाऱ्यावरची अनेक गावे उन्हाळ्यात बाजरीचे पीक घेत आहेत.उन्हाळ्यात स्वच्छ व दमदार हवामान असल्यामुळे बाजरीचे पीक जोरदार येत असून उत्पादनही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी उन्हाळी बाजरीचे पीक मोठ्या प्रमाणात घेताना दिसतात.उन्हाळी बाजरीची पेरणी केल्यानंतर शेतकऱ्यांना खुरपणी, खतपाणी आणि पक्ष्यांपासून निगा राखावी लागते.पाणी मुबलक प्रमाणात मिळाल्यामुळे यंदा बाजरीचे पीक जोरदार आले आहे. बाजरीच्या कणसांचे आकार मोठे असून, दाणे टपोरे आहेत. यामुळे बाजरीच्या उत्पादनात मोठी वाढ होईल, असे बाजरी उत्पादक शेतकरी सांगत आहेत.


**महाराष्ट्र शासन**

**वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय शिरुर, प्रा. रामलिंग पाबळ रोड शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे ४१२२१०.**

**निविदा सूचना क्र ०१ / सन २०२५-२६**

खालील कामांच्या सिलबंद निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय शिरुर (प्रा.) रामलिंग पाबळ रोड शिरुर, ता.शिरुर जि.पुणे ४१२२१० हे को-या निविदा या वनपरिक्षेत्र शिरुर कार्यालयातील प्रसिद्धी फलकावर दि २३.०४.२०२६ ते ३०.०४.२०२६ या कालावधीमध्ये भरुन हार्ड कॉपीचे स्वरुपात भरावयाच्या आहेत व भरुन पाठविलेल्या निविदा यांचे वनपरिक्षेत्र शिरुर कार्यालयात दि ३०.०४.२०२६ रोजी दुपारी १४.०० वाजे पर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ.क्र. | गाव | कामाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|
| १ | विठ्ठलवाडी | मा. उपवनसंरक्षक जुन्नर यांचेकडील मंजूरी पत्र जा.क्र.ब/कक्ष-४.२ /जमिन/५२३/२०२६-२७, दि. २२.०४.२०२६ अन्वये मौजे विठ्ठलवाडी फॉ.कं.नं.३९९ मधील १५ हे. क्षेत्रावर रोपवन करणे करिता एकूण १५ हे. क्षेत्रापैकी ०५ हे. क्षेत्रावरील प्रोसोपिस, काटेरी झाडे, झुडपे काढून उर्वरित १० हे. क्षेत्रावरील प्रोसोपिस, काटेरी झाडे, झुडपे काढून लाकडाची विल्हेवाट लावणे कामी लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. | खुला वर्ग |

१. वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात नोटीस बोर्ड सविस्तर निविदा सुचना पहवयास मिळेल. वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी विनंती केल्यास नोटीश प्रत विनामुल्य मिळू शकेल.
२. सदर निविदांसाठी शासन निर्णय क्र. निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ मां.प्र.-०१/ दिनांक ३०.१०.२०२३ मधील तरतुदी लागू राहतील.
३. कोऱ्या निविदा संचाची मागणी करताना अर्जासोबत निविदा फी ची दुय्यम पावती व कंत्राटदाराचा अर्ज नोंदणी प्रमाणपत्र यांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
४. ठेकेदाराने दिलेल्या दराची विधी ग्राह्यता ६० दिवसापर्यंत राहिल.
५. इसाऱ्याची रक्कम राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेड्युल बँकेची सहा महिन्याची मुदत ठेव पावती वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरुर यांचे नावाने सादर करावी.
६. कोणतीही / कोणत्याही अगर सर्व निविदा नाकारणेचा व रद्द करणेचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी शिरुर यांनी राखुन ठेवला आहे.
७. वनपाल / वनरक्षक व संबंधित कंत्राटदार यांनी क्षेत्रिय कामाची संयुक्त स्थळ निरिक्षण केल्याचा जिओटॅग सादर करावे.
८. वनपाल यांनी दिलेले प्रमाणपत्र निविदे सोबत सादर करणे आवश्यक राहील.

**निळकंठ गव्हाणे**
**वनपरिक्षेत्र अधिकारी,**
**शिरुर. (प्रा.)**

# मोहरी धरण दुरुस्तीला गती

## ३.०२ कोटींची निविदा प्रसिद्ध, मेमध्ये कामाला सुरुवात शक्य

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या मोहरी लघु पाटबंधारे तलावाच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर गती मिळाली असून धरण सुरक्षा पुनरावलोकन समितीच्या शिफारशीनुसार सुमारे ३ कोटी २ लाख ५२ हजार रुपयांची ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे तालुक्याच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर शासनाने गंभीरपणे दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

आमदार रोहित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर १३ एप्रिल रोजी धरण सुरक्षा पुनरावलोकन समितीने मोहरी तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यानंतर समितीने आवश्यक दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामांचा सविस्तर अहवाल कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे सादर केला.

दरम्यान, आमदार पवार यांनी नुकत्याच कर्जत दौऱ्यात मुख्य अभियंता संजीव चोपडे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून कामाला गती देण्याची मागणी केली होती.

त्यानुसार २३ एप्रिल रोजी ही निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

३० एप्रिलपर्यंत निविदा भरण्याची मुदत असून ४ मे रोजी ती उघडण्यात येणार आहे. त्यामुळे मे महिन्याच्या मध्यापर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



निवृत्त अधिकाऱ्यांच्या धरण सुरक्षा समितीने रणरणत्या उन्हात प्रत्यक्ष तलावात उतरून सुमारे दीड तास पाहणी केली होती.

कोणतीही मदत न घेता क्षतिग्रस्त भागाचे मोजमाप करून तातडीने उपाययोजनांचा अहवाल सादर करण्यात आला. या समितीत जामखेड तालुक्याचे सुपुत्र, निवृत्त अधिक्षक अभियंता शिवाजी बोलभट यांचाही समावेश होता.

समितीच्या शिफारशीनुसार सैल झालेला खडक काढणे, सांडव्याची भिंत नव्याने बांधणे, मुख्य भरावाच्या बाजूची भिंत (फ्लँक वॉल) उभारणे, वाहून गेलेल्या चरात काँक्रीट काम करणे तसेच निचरा करणाऱ्या कालव्याचा (टेल चॅनल) तळ व बाजू मजबूत करणे अशी महत्त्वाची कामे हाती घेतली जाणार आहेत.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार यावर्षी मर्यादित पावसाची शक्यता असल्याने मोहरी तलावाचे महत्त्व अधिक वाढले आहे. हा तलाव एका पावसात भरून खर्ड्यासह सुमारे दहा गावांच्या पाणीपुरवठा योजना व शेती सिंचनासाठी जीवनदायी ठरतो.

दुष्काळी परिस्थितीत टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठीही हा तलाव प्रमुख स्रोत ठरला आहे. दरम्यान, ही कार्यवाही जलदगतीने होत असली तरी निविदा प्रक्रिया पारदर्शक राहावी, सक्षम ठेकेदाराची निवड व्हावी व कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये, अशी अपेक्षा विजयसिंह गोलेकर यांनी व्यक्त केली.

पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याने प्रशासनाने वेळेत व दर्जेदार काम करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. मोहरी तलावानंतर समितीने पाहणी केलेल्या नायगाव प्रकल्पाच्या दुरुस्तीची निविदा प्रक्रिया देखील लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे.

---

### दखल



## कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारावा लागेल : ठाकरे

**अहिल्यानगर :** कामगार कायद्यामध्ये झालेले बदल कामगारांच्या दैनंदिन जीवनामध्ये परिवर्तन घडवावे लागणार आहे. तर कामगारांच्या न्याय हक्कासाठी एकजुटीने सर्वांना बरोबर घेऊन लढा उभारावा लागेल. असे सुतोवाच शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. भारतीय कामगार सेनेची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा छत्रपती शिवाजी स्मारक, दादर, मुंबई येथे पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी बोलताना ठाकरे म्हणाले कामगार टिकला तरच कारखाने टिकणार आहेत. त्यासाठी कामगारांनी एकजूट दाखविणे गरजेचे आहे. यावेळी भारतीय कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड ठाकरे यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. भारतीय कामगार सेनेच्या कार्याध्यक्षपदी अजितदादा साळवी व सहचिटणीसपदी मधुकर निकम यांची फेरनिवड करण्यात आली.

सलग ५८ वर्ष नेतृत्व करणे हे येड्या गबाळ्याचे काम नाही. त्यासाठी कामगारांच्या हिताची कामे करावी लागतात. तरच कामगार एकजुटीने पाठीशी उभा राहतो. असेही ठाकरे यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाच्यावेळी अहिल्यानगर शिवसेनेच्यावतीने उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे यांनी कामगार सेनेच्या कार्याध्यक्षपदी अजित साळवी व सहचिटणीसपदी मधुकर निकम यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा फोटा व शाल देऊन सत्कार केला. यावेळी मंचावर भारतीय कामगार सेनेचे अध्यक्ष मा. केंद्रीय मंत्री शिवसेना नेते खा. अरविंद सावंत उपस्थित होते.

या बैठकीसाठी महाराष्ट्र, गोवा, हरियाणा, पंजाब, मध्यप्रदेश या राज्यातून कामगार सेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध प्रश्नासंदर्भात भीमशक्ती संघटना आंदोलन छेडणार

**हातगाव :** भीमशक्ती संघटनेच्या वतीने येत्या बुधवार ( दि.२९) रोजी शेवगाव पंचायत समिती कार्यालयासमोर विविध प्रश्नासंदर्भात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येणार असल्याबाबतची माहिती भीमशक्ती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस प्रा. चंद्रकांत कर्डक यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तालुक्यातील सुळे पिंपळगाव येथील सुखदेव बोरुडे या मागासवर्गीय घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुलाचा प्रश्न निकाली काढण्यात यावा,कोळगाव येथील बौद्ध समाजाच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करून ते अतिक्रमण तात्काळ हटवण्यात यावे त्याच बरोबर शेवगाव शहरात असणारा बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाची शासकीय स्तरावरून सखोल चौकशी करण्यात यावी यासह इतरही काही प्रमुख मागण्यासाठी संघटनेच्या वतीने पंचायत समिती कार्यालयासमोर येत्या बुधवार रोजी आंदोलन छेडण्यात येणार असल्याचेही शेवटी प्रा. चंद्रकांत कर्डक यांनी सांगितले आहे.

## संत निरंकारी मिशनच्या वतीने रक्तदान शिबिर व सत्संग

**अहिल्यानगर :** सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज व निरंकारी राजपिताजी यांच्या आशीर्वादाने संत निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी महाराज यांच्या ४६ व्या स्मृति दिनानिमित्त 'मानव एकता दिवस' चे आयोजन करण्यात आले असून शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६ रोजी मिस्किन रोड स्थित संत निरंकारी सत्संग भवन येथे सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत जिल्हास्तरीय भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे तसेच रक्तदान विषयी जनजागृती व नागरिकांना माहिती व्हावी म्हणून गुरुवारी सायंकाळी निरंकारी सेवादल च्या वतीने दुचाकी वाहन रॅली शहरात व सावेडी परिसरात काढण्यात येणार आहे.

## जालिंदर बोरुडे यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान

**अहिल्यानगर :** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' जालिंदर बोरुडे यांना बौध्द संस्कार संघाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. नगर-संभाजीनगर येथील चेतना लॉनमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात हा सन्मान सोहळा पार पडला.

या कार्यक्रमात जिल्हा परिषद बुलढाणा येथील मुख्य कार्यकारी अधिकारी (आयएएस) गुलाबराव खरात यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यकारी अभियंता इंजि. पी.बी. गायसमुद्रे, उपजिल्हाधिकारी भारती सागरे, उपअभियंता अरविंद जाधव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे किरण साळवे, बौध्द संस्कार संघाचे अध्यक्ष तथा आयोजक भाऊसाहेब देठे आदी मान्यवर उपस्थित होते.

गुलाबराव खरात यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्यात काम करताना जालिंदर बोरुडे यांच्या कार्याचा जवळून अनुभव आला आहे. फिनिक्स फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थपणे समाजसेवा केली आहे.

---

### बालविवाह केला तर पालक, नातेवाईक, धर्मगुरू, पाहुणे, सरपंच, अधिकारी

# सर्वांवरच गुन्हे दाखल होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** शुभ मानल्या जाणाऱ्या अक्षय तृतीया निमित्ताने जिल्ह्यात विवाहांचे प्रमाण वाढत असताना बालविवाहाच्या घटनांनाही आळा घालण्यासाठी प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी कडक भूमिका घेतली आहे. बालविवाह ही परंपरा नसून गंभीर कायदेशीर गुन्हा आहे, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

स्नेहालयचा उडान प्रकल्प मागील सात वर्षांपासून अक्षय तृतीया काळात विशेष सतर्कता ठेवून कार्यरत आहे. कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून तातडीने विवाह थांबवणे, मुलीचे संरक्षण करणे आणि तिला पुढील पुनर्वसनासाठी बाल कल्याण समितीसमोर सादर करणे ही कार्यपद्धती राबवली जाते. स्नेहालय संस्थेने मागील २० वर्षांपासून चाईल्ड हेल्पलाईन १०९८ च्या माध्यमातून बालविवाह रोखण्यात महत्त्वपूर्ण काम केले असून, उडान प्रकल्पाद्वारे बालविवाह मुक्ती मिशन प्रभावीपणे सुरू आहे.




जिल्ह्यात सध्या बालविवाह प्रकरणांवर थेट गुन्हे दाखल होत असून बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६, भारतीय न्याय संहिता (इछड) आणि पॉक्सो कायदा अंतर्गत कठोर कारवाई केली जात आहे. विशेष म्हणजे, बालविवाहानंतर शारीरिक संबंध प्रस्थापित झाल्यास तो पॉक्सो अंतर्गत गंभीर गुन्हा ठरतो.

या गुन्ह्यात केवळ पालकच नव्हे, तर नातेवाईक, विवाह लावणारे धर्मगुरू, मध्यस्थ, आयोजन करणारे, खर्चासाठी मदत करणारे, तसेच पाहुणे म्हणून उपस्थित राहून समर्थन देणारे सर्वजण आरोपी ठरू शकतात. माहिती असूनही कारवाई न करणारे सरपंच, नगरसेवक किंवा अधिकारी देखील जबाबदार धरले जाऊ शकतात. भावनेतून मदत करणेही कायद्याने गुन्हाच मानला जातो.

बालविवाह रोखण्यासाठी शासनाने ग्रामसेवक, बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी सेविका तसेच गाव, वार्ड आणि तालुकास्तरावरील बाल संरक्षण समित्या यांना जबाबदारी दिली आहे. या समित्यांमध्ये शिक्षण, पोलीस, आरोग्य, पंचायत व महिला बाल विकास विभागातील अधिकारी सहभागी असून, नागरिकांनी त्यांच्याशी समन्वय साधणे अपेक्षित आहे.

याबाबत स्नेहालयचे संचालक हनिफ शेख आणि ड. बागेश्री जरंडीकर यांनी सांगितले की, बालविवाह सहन केला जाणार नाही. तर उडान प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक प्रविण कदम यांनी नागरिकांना आवाहन केले की, बालविवाह लपवू नका, त्वरित माहिती द्या.

कुठेही बालविवाह होत असल्यास १०९८ किंवा ९०११०२६४९५ वर संपर्क साधावा. माहिती गोपनीय ठेवली जाईल. भावना नाही, तर मुलीचे भविष्य आणि कायदा महत्त्वाचा आहे.

---

## आरक्षण उपवर्गीकरणासाठी मातंग समाज आक्रमक

**लिंपणगाव :** अनुसूचित जातींमधील आरक्षणाचे उपवर्गीकरण तातडीने अमलात आणावे, या मागणीसाठी मातंग समाजाने जोरदार भूमिका घेत राज्य सरकारकडे निवेदन सादर केले. बहुजन समता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव सकट यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.



सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणास मान्यता दिल्यानंतरही राज्य शासनाने अद्याप त्याची अंमलबजावणी केलेली नाही. यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या बत्रा समितीचा अहवाल सादर होऊनही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय घेतला जात नसल्याने समाजामध्ये नाराजीची भावना वाढत आहे.

या मागणीसाठी राज्यभर विविध स्तरावर आंदोलन छेडण्यात आले असून मुंबई, नागपूर व दिल्ली येथेही आवाज उठविण्यात आला आहे. मात्र, शासनाची भूमिका अद्याप स्पष्ट न झाल्याने मातंग समाजासह अनुसूचित जातीतील सुमारे ५९ उपजातींवर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नसल्यामुळे काही समाजघटक वंचित राहत आहेत. त्यामुळे अ, ब, क, ड या स्वरूपात उपवर्गीकरण करून आरक्षणाचे संतुलित वाटप करणे गरजेचे असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

इतिहासातील सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणामुळे मातंग समाज आजही विविध क्षेत्रात मागे असल्याने त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उपवर्गीकरण हा प्रभावी मार्ग असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या वेळी भगवानराव गोरखे (मातंग एकता आंदोलन), संजय पवार, अमोल ससाणे, नंदू ससाणे, अनिल तुपे, सत्यवान शिंदे, सचिन शिंदे संजय पवार आदी उपस्थित होते.

---

## स्मृतींच्या साक्षीने रंगला मर्दानी जल्लोष

**देवदैठण :** श्रीगोंदा तालुक्यातील सारोळा सोमवंशी येथे स्व. भागचंद गुलबराव आढाव यांच्या स्मरणार्थ आढाव परिवाराच्या वतीने कुस्तीसाठी आखाडा मैदान बांधण्यात आले.

सारोळा सोमवंशी (ता. श्रीगोंदा) येथे सालाबादप्रमाणे नुकताच भैरवनाथ यात्रोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात पार पडला. सरपंच उज्वला आढाव यांच्या पुढाकारातून स्व. भागचंद आढाव यांच्या स्मरणार्थ पत्नी शकुंतला आढाव व मुले किशोर आढाव आणि सचिन आढाव यांच्या वतीने भैरवनाथ यात्रोत्सवानिमित्त कुस्तीसाठी बांधण्यात आलेल्या लाखो रुपयांच्या आखाडा मैदानाचे उद्घाटन महाराष्ट्र केसरी पै. अशोक शिर्के, खरेदी विक्री संघाचे संचालक आदेश नागवडे, पुणे कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. स्वास्तिक चोंधे, युवा महाराष्ट्र केसरी विष्णू खोसे यांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते स्व.आढाव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर स्मृतींच्या साक्षीने मर्दानी जल्लोष रंगताना आखाड्यात उतरलेल्या मल्लांनी आपल्या ताकदीचा, चपळतेचा आणि कौशल्याचा कस लावत एकापेक्षा एक सरस झुंजी रंगवल्या.



तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सुनिल आढाव, संतोष उदर, प्रकाश उदार, देविदास आढाव, अनिल शेळके आदींनी कुस्त्या लावण्याचे काम केले. ५०० रुपयांपासून ते ११००० रुपयांपर्यंत कुस्त्या खेळत परीसरातील शेकडो मल्लांनी आखाडा गाजवला. तर उपस्थित प्रेक्षकांनीही टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोष करत मल्लांचा उत्साह वाढविला. यावेळी पठारे केसरी बाबासाहेब बाणेकर, माजी सरपंच प्रविण आढाव, आनंदा आढाव, संदिप मापारे, पोलिस पाटील कैलास उदार, विठ्ठल शेळके, मानसिंग आढाव, शिवाजीराव आढाव, मधुकर आढाव, उपसरपंच संदिप ननवरे, प्रविण मापारे आदिसह ग्रामस्थ उपस्थित होते. राहुल आढाव यांनी आभार मानले.

---

## न्यू इंग्लिश मिडीअम स्कूल पठारवाडी, निघोज येथे 'जादूचे प्रयोग' कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** श्री बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्थेचे न्यू इंग्लिश मिडीअम स्कूल पठारवाडी निघोज येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांच्या 'जादूच्या प्रयोगांचे' आयोजन करून विद्यार्थ्यांना मनोरंजनातून विज्ञानाची गोडी लावण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

या अभिनव कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष श्री. शांताराम कळसकर, उपाध्यक्ष श्री. प्रकाश कवाद , सेक्रेटरी श्री. वसंत कवाद, प्राचार्य श्री. डायस सर , व्यवस्थापिका सौ. संगीता कवाद, कॉर्डिनेटर मोनिका डायस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेक्रेटरी श्री. वसंत कवाद होते. यावेळी तालुक्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था या नात्याने भविष्यातही शिक्षण, मनोरंजनासोबतच वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविणारे अनेक अष्टपैलू उपक्रम राबविण्यास संस्था कायमच अग्रेसर राहील असा मानस त्यांनी व्यक्त केला.




व्यवस्थापिका सौ. संगीता कवाद यांनी जादूगार प्रकाश शिरोळे व गीतकार अरुण वाळुंज यांचा सन्मान केला. यावेळी केवळ पुस्तकी ज्ञान न देता, मनोरंजनातून शिक्षणाकडे जाण्याचा हा जादूच्या प्रयोगांचा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारा आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले.

सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी आपल्या बहारदार प्रयोगांनी उपस्थितांची मने जिंकली. चेंडूच्या थरारक कसरती, कानातून रुमाल काढणे यांसारख्या खेळांनी विद्यार्थी आश्चर्यचकित होऊन टाळ्यांचा कडकडाट केला. विशेष म्हणजे, शिरोळे यांनी काही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगात सहभागी करून घेतले आणि काही छोट्या जादूच्या क्लृप्त्याही शिकवल्या.

कार्यक्रमाचे संयोजक गीतकार श्री. अरुण वाळुंज यांनी जादू म्हणजे कोणतीही दैवी शक्ती नसून ती हातचलाखी आणि विज्ञानाचा सुरेख संगम आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्राजक्ता औटी यांनी केले. सौ.राजश्री वारे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला.

---

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण गोंधळ

## सरकारी कर्मचाऱ्यांचा संप तिसऱ्या दिवशीही सुरु; प्रलंबित मागण्यांवर ठाम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी संपावर असून, या संपाच्या तिसऱ्या दिवशी गुरुवारी (दि. २३ एप्रिल) अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'जागरण गोंधळ' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासनाने तातडीने प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढावा, अन्यथा संप अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

गुरुवारी सकाळपासूनच जिल्हाधिकारी कार्यालय परिसर संबळ, ढोलकीच्या गजराने दणाणून गेला होता. गोंधळी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने जागरण करत आंदोलनाला वेगळा रंग दिला. गोंधळाला या... गोंधळाला या... अशा गीतांसह आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.



या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, अशोक मासाळ, शंकर जगताप, भाऊ शिंदे, वैशाली बोडखे, पुरुषोत्तम आडेप, विलास पेद्राम, संदिपान कासार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनिल पंडित, माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे, शिक्षकेतर संघटनेचे संदीप पानमळकर, महानगर माध्यमिक शिक्षक संघाचे शहराध्यक्ष उद्धव गुंड, जीएसटी विभागाच्या वर्षा पारधी, दिपक चन्ने, प्रसाद सामलेटी, उषा पारधी, आप्पासाहेब जगताप, प्रसाद साठे, संतोष कार्ले, अमोल ठाणगे, सुधीर लाड, प्रमोद सूर्यवंशी, दिगंबर कर्पे, प्रमोद जोशी, शंकर जगताप, दुर्गा हरेल, कविता लोखंडे, शुभांगी खरात, अश्विनी खरपुडे, गंगासागर उगले, अनिता पवार, अमोल ठाणगे, बाळासाहेब निवडुंगे, भगवान सानप, सुषमा उमाप, सौ. सुतार, श्रीमती ज्योती दांगट, राहुल कोळेकर, नाड भाऊसाहेब आदींसह मोठ्या संख्येने कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे वारंवार लक्ष वेधूनही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे हा संप पुकारण्यात आला आहे. प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे यांचा समावेश आहे. तसेच केरळ राज्याच्या धर्तीवर ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना महाराष्ट्रात लागू करावी, अशा एकूण १८ मागण्या शासनाकडे करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या संपामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुतांश कामकाज ठप्प झाले असून, निवडणूक कामकाज वगळता इतर सर्व विभागांवर परिणाम झाला आहे. अनेक शाळांमधील शिक्षक संपात सहभागी झाल्यामुळे शैक्षणिक कामकाजावरही मोठा परिणाम जाणवत आहे. सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घेऊन मागण्यांवर निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा समन्वय समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## काका कोयटे यांचा राज्य फेडरेशनच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून गेली १५ वर्षे कार्य करणारे ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी वयाची ७५ पूर्ण करीत असल्यामुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. १५ एप्रिल २०२६ रोजी त्यांनी आपला राजीनामा संचालक मंडळाकडे सोपविला. राज्यातील सहकारी पतसंस्थांचे शिखर संस्था असलेल्या राज्य फेडरेशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी अत्यंत व्यापक असून, राज्यभर सतत प्रवास करणे आवश्यक असते. मात्र, वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर वाढत्या प्रकृतीच्या अडचणींमुळे हा प्रवास करणे अवघड झाले आहे. यासंदर्भात वैद्यकीय तज्ज्ञांनीही विश्रांतीचा सल्ला दिल्याने काका कोयटे यांनी हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच राज्य फेडरेशनच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होऊ नये, तसेच संस्थेच्या कार्यात सातत्य राहावे, या उद्देशाने त्यांनी स्वेच्छेने पदाचा राजीनामा दिला असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, काही माध्यमांमध्ये त्यांच्या राजीनाम्याबाबत चुकीच्या आणि विपर्यस्त बातम्या प्रसारित होत असल्याचेही निदर्शनास आले आहे. माझा राजीनामा हा पूर्णपणे प्रकृतीच्या कारणास्तव असून, इतर कोणत्याही वादग्रस्त प्रकरणाशी त्याचा संबंध नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.



# देवळाली प्रवरात विराट हिंदू संमेलन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : देवळाली प्रवरा येथे देवळाली प्रवरा, राहुरी फॅक्टरी, गुहा, जातप आदी गावांच्या वतीने विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना सरलाबेटचे महंत रामगिरी महाराज यांनी धर्म, समाज आणि विविध प्रश्नांवर आपले विचार मांडले. आपल्या भाषणात रामगिरी महाराज यांनी मंदिरांच्या सरकारी ताब्याबाबत प्रश्न उपस्थित करत, समाजाने धर्मपालन करताना जागरूक राहण्याचे आवाहन केले. तसेच वारकरी परंपरा सर्वांना सोबत घेऊन चालणारी असल्याचे सांगत अन्याय सहन करू नये, असे मत त्यांनी व्यक्त केले.



कार्यक्रमानिमित्त शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. सजविलेल्या फुलांच्या रथातून रामगिरी महाराज, मिलिंद वायकर व अर्जुन महाराज तनपुरे यांची आण्णासाहेब कदम पुतळ्यापासून शोभायात्रा काढण्यात आली.

जेसीबीमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. मिरवणुकीत राम, लक्ष्मण, सीता, छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ, मावळे तसेच संत तुकाराम व संत नामदेव यांच्या देखाव्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. महिलांनी भगवे पताके हातात घेत जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. टाळ-मृदुंगाच्या तालावर नाचगाणी, तोफांची सलामी आणि फटाक्यांच्या आतषबाजीसह ही मिरवणूक बाजारतळावरील संमेलन स्थळी पोहोचली. या मिरवणुकीचे नियोजन प्रिती कदम व नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी केले.

> देवळाली प्रवरा येथील भाविकांनी महंत रामगिरी महाराज यांच्याकडे २०२७ मध्ये होणारा सद्गुरू गंगागिरी महाराज सप्ताह देवळाली प्रवरा पंचक्रोशीला मिळावा अशी मागणी केली. १९२७ साली देवळाली शहरात हा सप्ताह पार पडला होता. पुढील वर्षी १०० वर्षे पूर्ण होत असल्याने सप्ताह मिळावा अशी आग्रही मागणी भाविकांनी केली.

व्यासपीठावर रामगिरी महाराज यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मिलिंद वायकर, किशोर निर्मळ तसेच संत महिपती देवस्थानचे अर्जुन महाराज तनपुरे उपस्थित होते. प्रास्तविक निमसे सर यांनी केले. महंत रामगिरी महाराज यांनी मीडियावरील प्रवृत्तीवर टीका करत समाजाने सजग राहण्याचे आवाहन केले. वारकरी संप्रदायात सर्वसमावेशकता असल्याचे सांगत समाजात परस्पर सन्मान वाढविल्यास धर्मांतराच्या घटना कमी होतील, असे त्यांनी नमूद केले. न्यायव्यवस्थेबाबतही त्यांनी काही ठिकाणी भ्रष्टाचार असल्याची खंत व्यक्त केली. कार्यक्रमास ह.भ.प. बाबानंद महाराज विर, नवनाथ महाराज म्हस्के, माजी आ.चंद्रशेखर कदम, बाबासाहेब महाराज वाळुंज, बाबा महाराज मोरे, नामदेव महाराज जाधव, संपत महाराज जाधव, बापू महाराज कोतकर, संजय महाराज शेटे, आबा महाराज कोळसे आदींसह मोठ्या संख्येने भाविक व महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चव्हाण यांनी तर स्वागत बाळासाहेब आढाव यांनी केले. कार्यक्रमानंतर हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# जमिनीच्या वादातून महिलेचा छळ

## पोलिसांकडून तक्रार न घेतल्याचा आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात जमिनीच्या वादातून एका विवाहित महिलेचा छळ करण्यात आल्याची गंभीर घटना समोर आली आहे. संबंधित महिलेला जातिवाचक शिवीगाळ, दमदाटी तसेच धक्काबुक्की केल्याचा आरोप करण्यात आला असून, याप्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेची सोनई येथे वडिलोपार्जित शेती जमीन असून त्या संदर्भात न्यायालयात खटला सुरू आहे.

असे असतानाही काही व्यक्तींनी बळजबरीने जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत पिके नांगरून टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. १८ एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणी विचारणा करण्यासाठी गेल्यानंतर संबंधित व्यक्तींनी महिलेशी उद्धट वर्तन करत जातिवाचक शिवीगाळ केली. तसेच तिच्या मुलाला धक्काबुक्की करून धमकावल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तुमच्यासारख्या लोकांना आम्ही पैसे देतो, अशा अवमानकारक शब्दांत अपमान केल्याचाही आरोप आहे. दरम्यान, पीडित महिलेने सोनई पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता, हा वाद सिव्हिल स्वरूपाचा आहे, असे सांगून तक्रार नोंदवून घेण्यात आली नसल्याचा गंभीर आरोप तिने केला आहे.

संबंधित आरोपी आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे दबाव टाकत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पीडित महिलेने पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. खोट्या तक्रारींचा त्रास; महिलेची दाद मागणी याच प्रकरणाशी संबंधित आणखी एका महिलेने पोलीस प्रशासनाकडे तक्रार देत, काही व्यक्तींमार्फत वारंवार खोट्या तक्रारी करून मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप केला आहे. संबंधितांकडून जाणीवपूर्वक खोटे अर्ज दाखल करून पोलीस ठाण्यात वारंवार बोलावले जात असल्याने तिच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद आहे. यापूर्वीही संबंधितांनी दमदाटी केल्याचा आरोप करत, खोट्या तक्रारी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महिलेने केली आहे. या संदर्भात अर्जाच्या प्रती सोनई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या असून, या प्रकरणात पोलीस प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रतापपूरचे मुरलीधर आंधळे यांना राज्यपालांच्या हस्ते 'राष्ट्रपती पदक'

## २६/११ चा हल्ला, नैसर्गिक आपत्ती बचाव मोहिमेत सहभाग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : राष्ट्रीय अग्निशमन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते मुंबई येथे नुकताच अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुंबई येथील लोकभवन येथे पार पडलेल्या सोहळ्यात संगमनेर तालुक्यातील प्रतापपूरचे भुमी पुत्र आणि मुंबई अग्निशमन दलाचे विभागीय अधिकारी मुरलीधर अनाजी आंधळे यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल 'राष्ट्रपती पदक' देऊन गौरविण्यात आले. मुरलीधर आंधळे यांची कारकीर्द अत्यंत धडाकेबाज राहिली आहे.

अग्निशमन दलात रुजू होण्यापूर्वी त्यांनी 'बॉर्डर सिक्युरिटी फोर्स' (बीएसएफ) मध्ये राहून राजस्थान, पंजाब, त्रिपुरा, पश्चिम बंगाल आणि जम्मू-काश्मीर यांसारख्या संवेदनशील सीमांवर देशसेवा बजावली आहे. १९९५ पासून ते मुंबई अग्निशमन दलात कार्यरत असून, भायखळा, मुलुंड, वडाळा, कुर्ला आणि विक्रोळी या




भागात त्यांनी देशसेवेची महत्त्वाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे. मुरलीधर आंधळे यांनी आपल्या दीर्घ सेवाकाळात अनेक थरारक आणि धाडसी मोहिमेत सहभाग घेतला. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यावेळी हॉटेल ताज आणि ऑबेरॉय येथे अडकलेल्या नागरिकांची सुटका करणाऱ्या विशेष पथकात त्यांचा सहभाग होता.

त्यापूर्वी, ११ जुलै २००६ च्या रेल्वे बॉम्बस्फोटांनंतर मुलुंड स्थानकावर राबवण्यात आलेल्या बचाव कार्यातही त्यांनी मोलाची भूमिका बजावली. केवळ मुंबईच नव्हे तर राज्याबाहेरही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे; २००८ मध्ये बिहारमध्ये आलेल्या महापुरात महाराष्ट्र सरकारच्या विशेष पथकाद्वारे त्यांनी अनेकांचे प्राण वाचवले. तसेच २०१६ मध्ये कुर्ला येथे झालेल्या इमारत दुर्घटनेत ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्या ८ ते १० जणांना सुखरूप बाहेर काढण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

त्यांच्या याच अतुलनीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना राज्यपालांच्या हस्ते हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. दरम्यान, मुरलीधर आंधळे यांना मिळालेल्या या राष्ट्रपती पदकामुळे संगमनेर तालुक्यासह प्रतापपूर गावात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# युवतीवरती अत्याचार करणाऱ्यास अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : एका एकवीस वर्षीय तरुणीचे त्याने स्वतःच्या मोबाइलमध्ये फोटो व्हायरल करण्याची धमकी देत एका युवकाने एकवीस वर्षीय युवतीवरती अत्याचार केले. तसेच या युवतीचे ज्या मुलाशी लग्न जमले होते, त्याच्या मित्रांच्या मोबाइलवर रजिस्टर लग्न झाल्याचे खोटे कागदपत्र पाठवून जमलेले लग्न मोडले. या प्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात पीडित पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी मकरंद संजय गोडगे (रा. चिंचोली गुरव, ता. संगमनेर) याच्यावर गुन्हा दाखल करत त्याला बेड्या ठोकल्या आहे पीडित युवती दुसऱ्या जिल्ह्यातील रहिवासी आहे. ती शिक्षणानिमित्त जानेवारी २०२६पर्यंत संगमनेरात असताना तिच्यावर अत्याचार झाला. पीडित युवती आणि मकरंद गोडगे यांची सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. सप्टेंबर २०२५ मध्ये गोडगे याने युवतीला भेटण्या साठी त्याच्या घरी बोलावले. ती तेथे गेली असता त्याने तिला ब्लॅकमेल करण्यासाठी दोघांचे फोटो मोबाइल मध्ये काढले. हे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत त्याने तिच्यावर अत्याचार केले. त्यानंतर तो वेळोवेळी तिला फोन करून 'मला तुला भेटायचे आहे, तू जर मला भेटायला नाही आली तर मी तुझी बदनामी करेल' अशी धमकी दिली आखेर तिने हा प्रकार नातेवाईकांना सांगितला त्या नंतर पोलीस ठाण्यात धाव घेत त्याला जेलची हवा खाण्यास लागली आहे.

# तेलकुडगावात तणावपूर्ण शांतता; गावाला पोलीस छावणीचे स्वरूप

## पुतळा विटंबना प्रकरणानंतर कडेकोट बंदोबस्त; मारहाणीचीही घटना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासे तालुक्यातील तेलकुडगाव येथे महापुरुषांच्या पुतळ्याच्या कथित विटंबनेच्या घटनेनंतर गावात तणावपूर्ण शांतता निर्माण झाली असून, गेल्या दोन दिवसांपासून कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात असून गावाला अक्षरशः पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर नेवासे तहसीलदार डॉ. संजय बिरादार, पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक तसेच राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी गावात तैनात करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.



दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित वादातून एका व्यक्तीला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली असून, शंकर साळवे असे जखमीचे नाव आहे. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी संबंधितांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घटनेच्या निषेधार्थ व गावात पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्याच्या मागणीसाठी दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते अशोकराव गायकवाड, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अरुण जाधव यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी बुधवारी जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. यावेळी सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, जखमी शंकर साळवे यांच्या पत्नी कल्पना साळवे यांनी वेगळी बाजू मांडत, ग्रामपंचायतीतील काम न झाल्यामुळे पतीने आपली व्यथा व्यक्त केली असताना त्याला पुतळा विटंबना ठरवून मारहाण करण्यात आल्याचा आरोप केला आहे. या घटनेला वेगळा रंग देण्याचा प्रयत्न होत असल्याचाही त्यांनी दावा केला.

### मारहाणीमागे कटकारस्थान : कल्पना साळवे

माझ्या पतीने महापुरुषांचे दर्शन घेतले असताना त्याला विटंबना कशी म्हणता येईल? ग्रामपंचायतीतील काम न झाल्यामुळे ते व्यथा मांडत होते. मात्र काहींनी मारहाण करून हा प्रकार झाकण्यासाठी वेगळे चित्र उभे केले, असा आरोप कल्पना साळवे यांनी केला.

### पोलीस अधीक्षकांसोबत सकारात्मक चर्चा

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करत, पुतळा पुन्हा बसविण्यासाठी योग्य जागा व समन्वयाने तोडगा काढण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.

### पोलीस संरक्षणाची मागणी

माझ्या पतीला मारहाण झाली असून आम्हाला न्याय मिळावा आणि संरक्षण द्यावे, अशी मागणीही साळवे कुटुंबीयांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून पुढील कारवाईबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ११ गोवंशीय जनावरांची सुटका






**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : कर्जत तालुक्यातील राशीन व राहुरी येथे कत्तल करण्यासाठी डांबून ठेवलेल्या ११ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने सुटका करून धडक कारवाई केली. यावेळी पोलिसांनी २ लाख ८३ हजार रुपये किमतीचे ११ जनावरे व दोन वाहने जप्त केली. या छाप्याच्या वेळी पोलीस पाहतात आरोपी पसार झाले.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल करणारे ठिकाणांची व गोवंशीय जनावरांची कत्तल करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखालील स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक संदिप मुरकुटे, पोलीस पथकातील कर्मचारी लक्ष्मण खोकले, सोमनाथ झांबरे, अमोल आजबे, प्रकाश मांडगे, सागर ससाणे, भगवान थोरात, रमिजराजा आत्तार, विशाल तनपुरे चालक अरुण मोरे यांचे दोन पथके तयार करुन कर्जत तालुक्यातील राशीन व राहुरी येथे या पथकाने छापा टाकला.

गुरुवारी पोलिसांनी कर्जत तालुक्यातील राशीन येथे छापा टाकून सोहेल राजू कुरेशी (रा. कुरेशी गल्ली, राशिन) याच्या ताब्यात असलेली ६० हजार रुपये किमतीची ४ जनावरे यांची सुटका केली. यावेळी सोहेल कुरेशी हा फरार झाला. तर दुसऱ्या पथकाने राहुरी येथे छापा टाकून ६३ हजार रुपये किमतीची ७ जनावरे यांची सुटका केली. तसेच १ लाख ६० हजार रुपये किमतीची दोन वाहने जप्त केली. यावेळी शाहरुख सुलतान कुरेशी (रा. राहुरी) व मुख्तार मुस्ताक कुरेशी (रा. राहुरी) हे दोघे फरार झाले. याबाबत पोलिसांनी दोन छाप्यात एकूण २ लाख ८३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. कर्जत व राहुरी पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

# भारतातून यंदा १ लाख ७० हजार हाजी साहेब मक्का मदिना येथे जाणार

## ४४ विमानातून १३ हजार हाजी मदीन्यात दाखल ; संपूर्ण शाही व्यवस्था

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या हज यात्रेस मोठया दिमाखात, शानदार प्रारंभ झाला आहे. आत्तापर्यंत भारतातून ४४ विमानांमधून सुमारे १२ हजार २१८ हाजी साहेब यात्रेसाठी मदिना येथे रवाना झाले आहेत. भारतीय हज कमिटी कडून १ लाख २२ हजार ५१८ तर हज ग्रुप ऑर्गनायझेशन (टूर्स) च्या माध्यमातून ४७ हजार ५०७ हाजी साहेब मक्का मदीना येथे यंदा हज यात्रेसाठी जाणार आहेत.



हज कमिटी कडून जाणाऱ्या हाजीसाहेबांची राहण्याची व्यवस्था अजिजिया येथे करण्यात आली आहे. तर हज ग्रुप ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून जाणाऱ्या हाजीसाहेबांची व्यवस्था प्रारंभिक मदिना येथे आणि नंतर मक्का येथे करण्यात आली आहे. गेल्या ४ दिवसापूर्वी भारतातून गेलेल्या बारा हजाराहून अधिक हाजीसाहेबांची रवानगी मदिना येथे झाली आहे. या सर्व हज यात्रे करूनचे कौन्सिल जनरल अहमद खान यांच्या हस्ते गुलाबपुष्प देत स्वागत करण्यात आले. अजिजिया येथे राहणाऱ्या सर्व हज यात्रे करुंसाठी मक्का येथे जाण्यासाठी दिवस आणि रात्र वातानुकूलित बसेसची मोफत आणि मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात आली आहे.

३० एप्रिल नंतर भारतातील काही हज यात्रे करूनची जेद्दा येथून मक्का आणि मदिना येथे जाण्यासाठी सोय करण्यात आली आहे. संपूर्ण देशभरातील हज यात्रे करू साठी मक्का मदिना येथे वेगवेगळ्या एरियात हज कार्यालयांबरोबरच विभागीय कार्यालय तसेच हॉस्पिटलची २४ तास सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सद्यस्थितीत मक्का आणि मदिना येथील तापमान कमाल आणि किमान १९ ते ३४ अंश सेल्सिअस अशा प्रमाणात नोंदविण्यात आले आहे.